
# हाकारा

वर्ष अठरावे • अंक चौथा

ऑक्टोबर - डिसेंबर १९९७

## साहित्य संमेलन विशेषांक



## सहावे आदिवासी साहित्य संमेलन, नाशिक

२४, २५ एप्रिल १९९७

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

स्फूर्तिस्थान / प्रेरणा : कै. *प्रा. गं. बा. सरदार*

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | प्रा. अ. रा. कुलकर्णी |
| उपाध्यक्ष | : | वैद्यरत्न भा. पु. नानल |
| मुख्य सचिव | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| सह सचिव | : | श्री. पुरूषोत्तम आगाशे |
| खजिनदार | : | डॉ. व्ही. एस. कुलकर्णी |
| सभासद | : | डॉ. एन. एस. देवधर |
| | : | डॉ. बी. व्ही. भानू |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | डॉ. एस. जी. देवगावकर |
| | : | ॲड. पद्माकर वळवी |
| | : | श्रीमती आरती कौलगेकर |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक**

# हाकारा

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ● संपादकीय | | |
| ● संमेलनाचे उद्‌घाटक, लोकसभेचे सभापती श्री. पी. ए. संगमा यांचे भाषण | | ३ |
| ● संमेलन अध्यक्ष श्री. भुजंग मेश्राम यांचे अध्यक्षीय भाषण | | ४ |
| ● संमेलन वृत्तांत | | १२ |
| ● एक आगळे वेगळे साहित्य संमेलन | : रमेश वैद्य | १७ |
| ● आदिवासी माणूस आहे, वस्तू नव्हे | : वाहरू सोनवणे | १९ |
| ● आदिवासी विकास : दशा आणि दिशा | : दादासाहेब बिडकर | २१ |
| ● आदिवासी स्वायत्ततेची चळवळ | : एल. के. मडावी | २४ |
| ● गौण वन उत्पादनांवरील आदिवासींचा हक्क मान्य केला | : रा. वि. भुस्कुटे | ३४ |
| ● संपादकास पत्र | | ३६ |



**वर्ष** अठरावे : अंक - चौथा
ऑक्टोबर - डिसेंबर १९९७

**मूल्य रू. १५/-**

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ३८७२१९

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
पुरुषोत्तम आगाशे

**अक्षरजुळणी**
सन ग्राफीक्स्
दत्तवाडी, पुणे ३०.
फोन : ५३०१६२

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
ज्ञान प्रबोधिनी मुद्रण विभाग
५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०.
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले



अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

साहित्य हा संस्कृतीचा आरसा आहे. साहित्यातून तत्कालिन समाजव्यवस्थेचे, भावभावनांचे, विचारांचे, व्यथा-वेदनांचे चित्र बघायला मिळते. आदिवासी समाज मुख्य प्रवाहापासून दूर राहिल्याने मौखिक परंपरेतून लोकसाहित्य टिकून होते. जसजश्या शिक्षणाच्या वाटा खुल्या झाल्या तसतसा आदिवासी शिकला, शहाणा बनला. साहित्य कृतींची निर्मिती होऊ लागली आणि त्यातूनच विनायक तुमराम, भुजंग मेश्राम, वाहरु सोनावणे, नजुबाई गावित व इतर अनेक प्रतिभावंत साहित्यिक निर्माण झाले.

आदिवासी साहित्याचा स्वतंत्र प्रवाह निर्माण झाला आणि त्याचे रुपांतर साहित्य चळवळीत झाले. या चळवळीचा मूर्त परिपाक म्हणजे आदिवासी साहित्य संमेलन. १९७९ साली नोव्हेंबरमध्ये भद्रावती, जि. चंद्रपूर येथे पहिले आदिवासी साहित्य संमेलन भरले होते. साहित्य संमेलन भरविण्यामध्ये अनंत अडचणी येत असल्याने आतापर्यंतची साहित्य संमेलने अनियमितपणे पार पडली. नुकतेच नाशिक येथे २४, २५ एप्रिल १९९७ रोजी सहावे आदिवासी साहित्य संमेलन अत्यंत उत्साहात पार पडले. संमेलनाला लाभलेला साहित्यिकांचा प्रतिसाद लक्षात घेता आदिवासी साहित्याचा वृक्ष जोमाने फोफावत असल्याचे दिसते. मात्र रसिकांचा लाभलेला अत्यल्प प्रतिसाद हा चिंतेचा विषय आहे.

आदिवासी साहित्य संमलेन केवळ आदिवासी साहित्यिकांना प्रोत्साहन देणारे संमेलन नसून, आदिवासीं बद्दलची ध्येय धोरणे, समस्या, विकास यासारख्या विषयांवर ऊहापोह करणारे वैचारिक व्यासपीठ आहे आणि म्हणूनच आदिवासी साहित्य संमेलनाचे महत्व असाधारण असे आहे.

संमेलनाचे उद्घाटक, लोकसभेचे सभापती श्री. पी. ए. संगमा यांनी आदिवासींनी आपल्या मुलांच्या शिक्षणावर भर देण्याचे ठासून सांगितले, केवळ शिक्षणामुळेच आदिवासींचा विकास होऊ शकेल. सुशिक्षित तरुणांनी राखीव जागेच्या कुबड्या न घेता स्वकर्तृत्वाच्या जोरावर खुली असलेली उच्च पदे देखील भूषवावी अशी अपेक्षा व्यक्त केली. या गोष्टींवर खरोखरच विचार करुन, मार्गक्रमण करणे जरुरीचे आहे.

संमेलनाचे अध्यक्ष श्री. भुजंग मेश्राम यांनी आपल्या भाषणामध्ये साहित्यातील निरनिराळे प्रवाह, दलित व आदिवासी साहित्याचा उगम व आजची स्थिती इत्यादींचा आढावा घेतला आहे. आदिवासी हा जगभरातून विखूरलेला आहे. उच्च वर्णीय लोकांकडून त्याचे शोषण आजही होतच आहे. त्या शोषणाचे, दुःखाचे, व्यथेचे प्रतिबिंब आदिवासी साहित्यातही पडताना दिसते. इवे ओर्चर, पिटीकी नटली, डेव्हीट डिओप, ज्वॅाय हॉर्जो, बर्नीबुश, आध्वा दयाल तसेच वाहरु सोनावणे यासारख्या निरनिराळ्या देशातील, वेगवेगळ्या संस्कृतीत वाढलेल्या आदिवासी कविंच्या कवितेतून डोकावणारे दुःख, वेदना, व्यथेचा समान धागा सोदाहरण उलगडून दाखवला आहे.

'आदिवासी माणूस आहे, वस्तू नव्हे' या आपल्या लेखातून श्री. वाहरु सोनावणे यांनी आजवर आदिवासींना स्वतःच्या फायद्यासाठी धार्मिक नेत्यांनी, राजकारणी नेत्यांनी कसा वापर करुन घेतला व कसे शोषण केले यांवर प्रकाश झोत टाकला आहे. आदिवासींना या चाकोरीतून, बंधनातून मुक्त व्हायचे असेल तर स्वावलंबनाशिवाय पर्याय नाही असे सुचविले आहे. उत्तर महाराष्ट्रातील आदिवासी भागात शिक्षण क्षेत्रामध्ये महान कार्य करणारे श्री. दादासाहेब बिडकर यांनी लेखातून आदिवासींच्या निरनिराळ्या प्रश्नांचा वेध घेतला आहे.

या अंकामध्ये विदर्भातील आदिवासी साहित्यिक श्री. एल. के. मडावी यांचा आदिवासी स्वायत्ततेची चळवळ हा दीर्घ लेख आहे. या लेखामध्ये त्यांनी स्वायत्ततेचा अर्थ, घटनात्मक तरतुदी, आदिवासी भागातील चळवळी, स्वनिर्धारण या मुद्दयांवर चर्चा केली आहे. ओरिसा राज्यातील रायगड जिल्हयामध्ये स्थानिक अदिवासी महिलांनी संघटित होऊन गौण वन उत्पादन विक्रीचा अधिकार कसा मिळवला याचे वर्णन श्री. रा. वि. भुस्कुटे यांच्या लेखातून वाचायला मिळते.

'हाकारा' चा हा अंक विचारवंतांना, अभ्यासकांना मार्गदर्शन करणारा तसेच सर्वसामान्य वाचकांना उद्बोधपूर्ण ठरणारा आहे. आपला अभिप्राय जरूर कळवावा.

**- रा. के. मुटाटकर**

# संमेलनाचे उद्‌घाटक, लोकसभेचे सभापती श्री. पी. ए. संगमा यांचे भाषण

"आपण आदिवासी उगाचच न्यूनगंड बाळगतो. आपण खरे तर सकारात्मक विचार केला पाहिजे. लक्षात ठेवा, आत्मविश्वासच सर्व काही करू शकतो आणि तो केवळ शिक्षणानेच येतो. मी सभापती झालो तेव्हा मला विचारण्यात आले, की कसे वाटते. तेव्हा मी 'चांगले' एवढेच उत्तर दिले. कारण विचारले त्यावेळी मी म्हणालो, की सभापतीची जागा राखीव नसल्याने ती मला लाभली याचा मला आनंद आहे.

प्रत्येक आदिवासी गावात एक प्राथमिक शाळा काढावी, दोन-चार गावे मिळून एक माध्यमिक विद्यालय उघडावे आणि १०० गावे मिळून महाविद्यालय काढावे. आदिवासींना ही जागा राखीव आहे, ती राखीव आहे. पण त्यांना शिकवले नाही तर या जागांचा मुळात उपयोग काय? आदिवासी शिकतो, तो हुशार आहे, यावर लोकांचा विश्वासच बसत नाही. हीच माणसे आदिवासींना साधे म्हणतात. मला या साधा शब्दाचा खूप राग आहे. कारण ही माणसे हृदयापासून साधे बोलत नसतात. त्यांना खरे तर आपल्याला बुद्धू म्हणायचे असते. पण धाडस होत नाही म्हणून साधे म्हणतात. लक्षात ठेवा, आपल्याला साधे राहण्याची काही गरज नाही. मस्त राहा. हा देश आपला आहे. आपणच येथील मूळ मालक आहेत. तुम्ही फक्त शिका. शिक्षणच तुम्हाला तारेल.

सहावे आदिवासी साहित्य संमेलन, १९९७

भटक्या व दलितांची आदिवासीशी तुलना करता आदिवासींची स्थिती फारच चांगली आहे कारण आदिवासी हा संघटित असतो. भटक्या विमुक्तांसारखा, दलितांसारखा तो विखुरलेला नाही. मात्र हळूहळू हा गुणही दूर होत आहे. त्रिपुरा, सिक्कीम पूर्वी १०० टक्के आदिवासी राज्ये होती. आज तेथे २५ टक्केही आदिवासी नाहीत. आज बहुसंख्यांकावरून आम्ही अल्पसंख्यांकावर गेलो आहोत म्हणून तुम्ही जेथे राहता तेथे एकत्र राहा. बिगर आदिवासी लोकांना तेथे राहण्यास येऊ देऊ नका. माझी तुम्हा सर्वांना ही पहिली विनंती राहील. तुम्ही विस्कळित होऊ नका.

वनाचे आणि पाण्याचे साठे देशात जेवढे काही राहिले आहे, ते केवळ आदिवासी भागात आहे. त्याचा उपयोग करा पण त्याला सांभाळाही.

आदिवासीच खरा या देशाचा मालक आहे. रामायण ज्याने लिहिले तो वाल्मिकी शिकारी होता. व्यासांनी महाभारत लिहिले पण त्यांची आई मासेमारी करायची.

आपण आदिवासींच्या कल्याणासाठी कायम कार्यरत राहू."

• • •

*साहित्य संमेलनाचे अध्यक्ष*

# भुजंग मेश्राम यांचे अध्यक्षीय भाषण

*मान्यवर उद्घाटक महाराज, मंचकावरील बुजुर्ग महानुभव आणि आदिवासी साहित्य प्रेमी भगिनी बंधुनो,*




आता आपण ज्या जागी एकत्र जमलो आहेत, तो हा परिसर प्राचिन काळी दंडकारण्याचा भाग होता. असे नोंदवलेला इतिहास सांगतो. या दंडकारण्यात जशी जंगली श्वापदे होती तशा वन्य जमाती आणि प्रबळ भटक्या टोळ्याही. जगण्यासाठी प्रत्येकाला संघर्ष करावा लागत होता. आजही तसा करावा लागतो. कदाचित त्या काळी तिरकामठे, तुळके, दगड, ऋचा ही शस्त्रे असतील, आज आपण मौखिक परंपरा जपून आपल्या सारख्या लिखित वाङमय निर्माण करणाऱ्यांकडे मूळनिवासी हितसंबंध व लेखणी ही शस्त्रे आहेत. पूर्वीचे दंडकारण्य आता औद्योगिक अभयारण्य झाले आहे. आणि या अभयारण्यातून साहित्याचा राजमार्ग गेलेला आहे. या राजमार्गावर टोळी समुहांचं संघटित आदिवासी साहित्य संमेलन भरवून देशातल्या, जगातल्या आदिवासींच्या जाणिवांशी पडताळा करून नाळ जोडायला आणि समुहाचे वाङमय सर्वदूर नेण्याचा कृती कार्यक्रमासाठी आपण एकत्र जमलो आहोत.

जगभरच्या आदिवासींबद्दल आजपर्यन्त इतके लिहून आले आहे की, ग्रंथ प्रामाण्याचाही पेचप्रसंग निर्माण व्हावा. तथापी आदिवासी म्हणजे आदिम, रानटी, असंस्कृत, वन्यजन, या व्याख्येबद्दल बिगर आदिवासी समुहांचे सर्वसाधारण एकमत दिसते.

मानव वंशशास्त्रज्ञांनी आदिवासींच्या केलेल्या व्याख्या अंधारातच राहिल्या, लोकजीवनाच्या व्यवहारात मात्र आदिवासी संस्कृती बद्दल पूर्वग्रहांची वाढ झाली असता माणूस उत्क्रांतीच्या संक्रमण काळात असतांना 'आदिम' ही मानवी, अवस्था होती. त्यावेळी नातीगोतींवर आधारलेली विवाह संस्था पूर्णपणे विकसित झाली नव्हती. माकड हा जसा माणसाचा पूर्वज असल्याचे सर्वमान्य आहे. तसे जगातले सर्व मानव समूह 'आदिम' या अवस्थेतून गेले आहेत. या मानव समुहांनी उत्पादनाची साधने जशी शोधून काढली, संचवृत्ती वाढली व भटकेपण संपले, विवाह संस्था प्रस्थापित झाली, त्यांना प्रगत सुसंस्कृत समजले जाऊ लागले, जे पुर्वीच्या ठिकाणी स्थिर राहिले त्यांना रानटी व असंस्कृत समजले जाऊ लागले. परंतु आदिवासींना 'आदिम' म्हणता येणार नाही. आदिम अवस्थेच्या फार पुढे व प्रगत समाजाच्या प्राथमिक काठावर अशी आजच्या आदिवासींची अवस्था आहे. तथापि बरेच जण आदिवासींना आदिम म्हणतात. हे त्यांच्या वर्गाचे हितसंबंध जपण्याचा भाग आहे. वस्तुत: 'आदिम' 'आदिवासी' या दोन्ही वेगळ्या गोष्टी आहेत. या भूमिवरचा मुळचा रहिवासी या अर्थाने आदिवासी (इंडिजीनस) हा शब्द आहे. आदिवासींमध्ये आदिम अवस्थेतल्या मातृसत्तेचे प्रभावी अवशेष आहेत. ही चांगली गोष्ट आहे. आदिवासींची विवाह संस्था, जीवन पद्धती, संस्कृती चालीरीती या संपूर्ण सकस व अस्सल आहेत फक्त व्यवसाय उत्पादन पध्दती व वस्तुविनिमय या महत्वाच्या गोष्टीत स्थिरता राहिल्याने आदिवासी हे अविकसित राहिले. वैश्विक पातळीवर अविकसित देश असावेत तसेच ! परंतु ती वेगळी गोष्ट झाली.

या अविकसित समुहांकडे प्रगतीच्या संस्कृतीचा अभाव असल्याचे ठरवून त्या समुहांकडे असलेल्या संगीत, कला, मौखिक वाङमयाच्या सृजनशील बाबींकडे दुर्लक्ष करण्यात आले. अथवा ते गृहितच धरले गेले नाही. ज्यावेळी पूर्व सुरीचा तपशिल नोंदवला गेला, तो लोक साहित्य म्हणून ! प्राचिन काळापासून भारतावर परकियांनी ही आक्रमणे केली, त्यांचा इतिहास आपणास सर्वसाधारण माहित आहे. शेवटून दुसरे जे ब्रिटीशांचे वसाहतवादी आक्रमण झाले ते अत्यंत नियोजित व वसाहतवादी स्वरूपाचे होते. या वसाहतवादाला टिकवण्यासाठी त्यांना जी नवशिक्षित नोकरशाही हवी होती, आपण इमाने इतबारे ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटीशांना पुरविली.

वसाहतवादासोबत ज्या ज्या गोष्टींनी नवशिक्षित भारतीयांवर प्रभाव पडला, त्या होत्या पश्चिमी संस्कृती, पश्चिमेचे साहित्य व पश्चिमेचे वाद, त्यामुळे आज जे अस्सल साहित्य किंवा वाङ:मय म्हटले जाते त्यावर पश्चिमेचा व पश्चिमेवर पोसलेल्या भारतीय अभिजन वर्गाच्या मानदंडाचा प्रभाव जास्त आहे. भारतीय समाज रचनेतील विषम स्तर रचना, बंदिस्त वर्ग, परकीय भाषेचा अभिनिवेश, अनेक जातींच्या प्रतिकात्मक एकात्मतेचा आग्रह, मुठभर अभिजनांची सांस्कृतिक मिरासदारी, स्वयं करणाऱ्या उपऱ्या संस्कृतीचे हस्तीदंती चित्रण करणारे लेखक, इ. बाबी वास्तव म्हणून समोर असतांना वाङ:मय हे विशिष्ट वर्गाचे/समुहाचे क्रीडांगण ठरवण्यात आले. परिणामी जे ग्रामीण, अप्रगत, असंस्कृत मानल्या गेल्या त्यांचे तोंडी लावण्यापुरते चित्रण करून त्यांना साहित्यापासुन अस्पृश्यच ठेवल्या गेल्या. वसाहतवादाच्या संक्रमणातूनच ज्योतिबा फुले, बाबासाहेब आंबेडकर, बिरसा मुंडा असे महत्वाचे विचारक तयार झाल्याने अप्रगत समुहांचे हितसंबंध तयार झाले.



सहावे आदिवासी साहित्य संमेलन, १९९७

सामुहिक मानवमुक्ती प्रगती हा मार्ग बनला. या अविरत लढ्यांचे प्रतिबिंब मग साहित्यात पडू लागले. आदिवासींच्या असंख्य चळवळींनी अनेक सृजनशिल लेखक/विचारवंत तयार झाले हे साहित्य चळवळीचे बाय प्रॉडक्ट बनले. दलित लेखक जे लिहू लागले त्याला इतरांकडून 'दलित साहित्य' असे नाव देऊन संबोधण्यात आले. आणि दुसरीकडे 'साहित्याला जात नसते, असे सुभाषित ओकण्यात येऊ लागले. जागतिक स्तरावरील काळ्या साहित्याचे अस्तित्व पाहून दलित साहित्य हे प्रतिक्रियांचे रूपातील साहित्य समजले जाऊ लागले. असे समजणे किती दुधखुळेपणाचे होते हे आता दलित साहित्याच्या अस्सल व प्रचंड साहित्य वाङमय निर्मितीवरून दिसून येते. दलित मराठी साहित्य जागतिक स्तरावर पोचेल. हे वास्तव असूनही दलित साहित्याचे संस्कृतीकरण करून ते समापनात काढण्याचा प्रयत्न मऱ्हाटी सारस्वतांनी केलाय त्यावर उताराही झाला.

मग दलित साहित्य असतांना आदिवासी साहित्याची वेगळी नवाटी कशासाठी? असा खवचट प्रश्न विचारून पुन्हा बोगस आदिवासी लोकांचे लेखक मेळावे भरवण्यात येऊ लागले. याचे कारण जास्त जास्त भूगर्भातला लाव्हारस बाहेर येईल. त्यामुळे जी साहित्याची लेणी तयार होतील ती होऊ नये व समाजाच्या भूमीतला लाव्हारस आतच दाबाला जाईल ही त्यांची सुसंस्कृत इच्छा आहे. आदिवासी साहित्याने डॉ. कन्ना मडावी सारखे बनावे अशी कुणाची हुकूमी अपेक्षा असेल तर ती आधुनिक एकलव्याची गोष्ट होईल.

आदिवासी हा विकासाच्या नावाखाली फासावर चढवलेला सुप्रसिध्द बळीराजा आहे. वसाहतवादी मुल्यांचा प्रभाव, भांडवली लोकशाहीतील मध्यमवर्गीय माध्यम मार्ग यांच्याच माध्यमातून जे बुध्दीवंत मानवसमुह भारतात अभिजन / एलाइट म्हणून मुठभर वर्ग देशाच्या व सर्वहारा समुहाच्या विकासाची धोरणे ठरवतो, त्यांचा वैचारिक कंड शमविण्यासाठी व प्राचीन भारतीय संस्कृती थोर असल्याची बतावणी करण्यासाठी, आदिवासी समूह हे म्युझियम्सचे

पिसेस असणे व ते चिरंतन टिकणे आवश्यक आहे. आदिवासी हा पूर्व सुरीनींच रानटी ठरवल्याने त्यांचाही अभिव्यक्तीची व त्यांचे हितसंबंध गृहित धरण्याची आवश्यकता कुणालाच न वाटल्याने भारताच्या राष्ट्रीय उद्यानामधला आदिवासी बंडखोर व सृजनशील बनला आहे. आदिवासी साहित्याचे प्रयोजन यामध्येच दडलेले आहे असे मला वाटते. भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातल्या मराठी साहित्याचे ४५ वर्षात, पश्चिमेच्या कालबाह्य वाङ:मयीन वादांच्या सहाय्याने मराठी साहित्य प्रगल्भ व सर्वसमावेशक बनविण्याचे फार प्रयत्न झालेत. इंग्रजी वाघीणीचे दूध पिवून, उच्चभ्रू मराठी लेखक, विचारवंतांनी मराठीला डोंबारणीच्या त्यावर खेळागत बनवलं. ज्यात तिला दोरीवर तोल सांभाळावा लागतो. रसिकांचे मनोरंजन करावे लागते. आधुनिक म्हणवणाऱ्या पश्चिम नवतेच्या सूचीपर्ण उंच झाडावर मराठी कवितेतली अस्सल देशी परंपरा कलम करून लावण्याचा प्रयत्न झाल्याने व अतिअधुनिकता बनून मराठी साहित्य फार प्रगत व पुरोगामी होईल असा भ्रम बाळगल्याने मराठी अवघड झाली. मराठी साहित्यात नव्या संकल्पनांच्या जाळ्यांनी मासेमारी सुरू झाली. या भूमितल्या तत्वज्ञानापेक्षा आयात केलेले सौंदर्य शास्त्र कंपलसरी झाले. अध्यापनक्षेत्रातील समीक्षक मंडळी अंधप्रसारकांसारखे पश्चिमेतले कालबाह्य झालेले वाद व सिध्दांत मराठीला अनुदानात देऊ लागले.

प्रेरणा व आधार यांच्या पळवाटीने परदेशी कलाकृतींवर मऱ्हाटी संस्कार करून स्वत:च्या नावावर पाककलाकृती निर्माण करू लागले. वरील प्रकारचा फोलपणा त्या काळ्या बंडखोर तरूण मराठी लेखकात व चळवळीतल्या लेखक कार्यकर्त्यांना लवकर लक्षात आल्याने त्यांनी वरील भुरट्या व उपऱ्या प्रस्थापितांविरूध्द लघुनियतकालिकांची चळवळ सुरू केली, यामध्ये प्रस्थापितांचा तात्विकपणा उद्ध्वस्त करून नवीन अनियतकालीके व प्रकाशने सुरू करणे हा उद्देश होता. ही चळवळ बऱ्याच अंशी यशस्वी झाली व मराठीला डझन भर तरी स्वतंत्र प्रज्ञेचे लेखक लाभले.

तथापि यामध्ये प्रस्थापितांच्या शास्त्रांनी वर्गशत्रुंशी लढाई पुकारल्याने व लघुनियतकालिकांच्या चळवळीचे प्रेरणा ही पश्चिमेच्या बंडखोर अस्तित्ववादावर आधारीत असल्याने स्वातंत्र्य लढ्यातील १८५७ च्या बंडासारखी ही चळवळ फसली. परंतु लघुनियतकालिकांची चळवळ म्हणून १८५७ सारखी शिपाई गर्दी नव्हती. फसलेल्या वाङमयीन बंडानंतर यातील लेखक आपआपल्या वाटांनी गेले. राजा ढाले, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम इत्यादी दलित साहित्याकडे तर तुळशी परब, काळसेकर ही मंडळी नव्या वर्गशत्रुंच्या शोधात निघाली. भालचंद्र नेमाडे, चंद्रकांत पाटील, दिलिप चित्रे, मराठी साहित्यातले प्रदुषण नष्ट करण्यासाठी पर्यावरण चळवळ चालवू लागले. लघुनियतकालिकांचे अल्पजीवी व जोरकस चळवळीनंतर मराठी साहित्याच्या अभयारण्यात दलित साहित्याचा वणवा पेटला.

इतिहासात खांडवा वन पेटल्याचा दाखला देऊन दलित लेखक शत्रुच्या मराठी साहित्यातला राब जाळायला निघाले. तुकारामानंतर, मराठीतल्या चिरेबंदी मठात हादरा देणारी नामदेव ढसाळची कविता आली. मराठी कवितेचे पाणी गतिमान झाले. वसाहतकालीन ते स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यात माहिती ज्ञान विस्तार अनुवाद - उसनवारीत गंड - छंद - मनोरंजन स्मृती गौरव - पळवाट कोष - मध्यमवर्ग - मध्यममार्ग भूरकावळी वृत्ती यांचा एकछत्री अंमल असल्याने दलित साहित्याने या सत्तेचे विकेंद्रीकरण केले. परंतु दलित साहित्याला आंबेडकर वादाचे चौकोनी आकाशविहीत केल्याने व आत्मचरित्रांचा भुतकाळी पाऊस पडू लागल्याने दलित साहित्याच्या मर्यादा दिसू लागल्या. कविता, चरित्र, एकांक यांच्या पलिकडे न गेलेले दलित साहित्य मात्र अभिनिवेशी झाले. दलित साहित्याची व्याख्या जेवढी प्रगल्भ, साहित्य मात्र सजातीय असा प्रकार सुरू झाल्याने मराठी सारस्वतांनी शत्रुला भरल्या घडयासारखे डोक्यावर घेऊन नृत्य केले. शिष्यवृत्या सुरू झाल्या. आवृत्या वाढल्या एक दिवसीय क्रिकेट सारखे झटपट तंत्र सुरू झाले. चरित्रांत मागणी तसा पुरवठा सुरू झाला.

मराठीतला पांढरपेशा वर्ग दलित चरित्रात लैगिंक वर्णने

शोधू लागला दलित साहित्य हाच मराठी साहित्याचा मुख्य प्रवास होता की काय अशी सुखद शंका येतांनाच प्रस्थापित सारस्वतांनी २५ वर्षानंतर भरल्या घड्याखालून अलगद डोके बाजुला केले व दलित साहित्यांनी भरलेली घागर जमिनीवर आपटली. गौरवाची जागा टिकेने घेतली. दलित लेखकांत स्पर्धात्मक सृजनाचे टोमणे मिळू लागले. त्यांचा बकूब कमी असल्याचे कळू लागले. दलित लेखकांत पोतराज ठरविण्यात येऊ लागले. पुन्हा अस्सल, देशिय व मराठीला श्रीमंत करणाऱ्या कृतींची मागणी होऊ लागली व अल्पसंख्याक अभिजन वर्ग मराठी साहित्याला बंदी बनवू लागला. दलित साहित्याच्या खांद्यावर बंदूक ठेवून मराठी साहित्याने, जागतिक वाङ:मयातल्या सवाष्णी कडून ओवाळून घेतल्यावर, दलित साहित्याचे संस्कृतीकरण करण्याचा प्रयत्न चालवला पण मराठी साहित्य महामंडळाच्या कुटुंबात आजपर्यंत कुठल्याही दलित साहित्य संस्थेस सामावून घेतलेले नाही.

आता आदिवासी - विमुक्त - भटके यांनी दलित लेखासह विद्रोही व वेदनेचे साहित्य लिहता लिहता मध्येच आत्मशोध घेतल्यावर लक्षात आले की,

अ) आदिवासी साहित्य म्हणून आजवर जे लिहले गेले ते क्रमिक पुस्तकासारखे होते.

ब) आदिवासी साहित्य आदिवासींपेक्षा बिगर आदिवासी उच्चभ्रू रसिकांसाठी लिहिले जात होते.

क) आदिवासी साहित्याला बहुभाषिकत्व असूनही, हे साहित्य संस्कृत प्रचूर व प्रमाण मराठीत लिहले गेले.

ड) प्रस्थापितांच्या शस्त्रांनीच लढाई लढण्यापेक्षा नव्या साधनसंपत्ती व शस्त्रांचा शोध आदिवासी लेखकांना लागल्याची माझी समजूत असल्याने साहित्याला आदिवासी जाणिवेत स्थान असणे आवश्यक आहे.

इ) आदिवासी हितसंबंधाची जाणीव म्हणजे आदिवासी असल्याचा अभिनिवेश न बाळगता या मानव समूहांना अप्रगत जीवन पध्दतीमधून बाहेर काढून त्यांच्या उत्पादन साधनांचा व संस्कृतीचा विकास साधणे होय अशी समजूत झाली आहे.

वरील वस्तुस्थितीच्या सोबत जगभरच्या व महाराष्ट्रातल्या आदिवासींची सामाजिक / सांस्कृतिक वस्तुस्थिती पाहून वाङ:मयातील संस्कृती पडताळली तर आदिवासी साहित्य चळवळीला ते पोषक ठरणार आहे.

जगभरचे आदिवासी हे वसाहतवादाचे व तथाकथित विकासाच्या सिध्दांतचे बळी आहेत हे मी आधी सांगितलेच आहे.

संस्कृती बनविण्याठी झाडे तोडावी, तशा या आदिवासींच्या कत्तली पुर्वीपासूनच आजपर्यन्त सुरू आहेत. आपण ज्ञानेश्वरांची सप्तशताब्दी साजरी करतांना अमेरिका येथे लाखो रेड इंडियन्स आदिवासींना मारणाऱ्या दर्यासारंग कोलंबसची पंचशताब्दी, स्वातंत्र्य देवतेचा पुतळा साक्ष ठेवून साजरी केली गेली.

भारताच्या शोधात निघालेल्या कोलंबसला अमेरिका गवसली नव्हे रेड इंडीयन्स भूमी पावली, संस्कृतीचा मायाबाजार उभारावयाचा तर असंस्कृत कसे चालतील? शिवाय त्यावेळी 'भुमी सब गोपलकी', असे म्हणण्या एवढी प्रगती झाली नव्हती. इतिहासात हिटलर व त्यांच्या सैन्याने ज्यूं लोकांच्या केलेल्या कत्तलीची नोंद आहे पण कोलंबस आणि अमेरिगो व्हेस्पिसी सारख्या व्यापाऱ्यांनी आदिवासींच्या केलेल्या कत्तलीची नोंद नाही. नोंद आहे ती कोलंबस आणि अमेरिगोच्या दर्यावर्दी साहसांची आणि आपल्याकडे भरत नावाच्या आर्य आक्रमणी राजावरून भारत देशाचे नाव पडल्याचे आम्ही ऐकतो - वाचतो, तसे अमेरिगो व्हेस्पिसी वरून 'अमेरिका' हे नाव पडल्याचे वाचतो आणि धन्य होतो!

आणि मराठीत लक्ष्मणशास्त्री जोश्यांपासून गोविंद तळवलकरांपर्यंत ते संस्कृतीचा आग्रह धरून तीची व्याख्या

सांगतात व अंधश्रध्दा निर्मुलक श्रीराम लागू असंस्कृतां विरूध्द लढाई पुकारण्याचा संकल्प सोडतात, तेव्हां संस्कृती म्हणजे दुर्बलांना नष्ट करून, त्यांचे म्युझीयम्स बनवून वर त्यांचा गॅझेटमय इतिहास लिहून जे मानदंड निर्माण होतील ती संस्कृती असा अर्थ हळू हळू लागतो.

उरलेल्या लाखो रेड इंडियन्सना घेट्टों मध्ये पाठवून, प्रशांत महासागरात स्वातंत्र्य देवतेचा पुतळा उभारला की संस्कृती तयार होत असते.

स्वातंत्र्याची किंमत आदिवासींनी आपल्या रक्तानी चुकविली आहे. जशी संस्कृती तसे हत्यार असे वि. का. राजवाडेनी सांगितले आहे. त्यामुळे गाफिल एकलव्याला अर्जुनाने मारणे समर्थनीय ठरते. तर भक्षकाने भुंगा होऊन सूड घेणे निंदनिय ठरते. ही एकमेव सत्यमेव संस्कृती संघर्षाचा भाग आहे. केनियाच्या न्युगि वा ध्योंगो या आदिवासी लेखकाने 'अ फाल्स हिरो ऑफ इंडिपेन्डन्स' या कथेत वर्णन केले आहे. 'डी कॉलोनायझिंग',' द मांइड' या त्यांच्या वाङ:मयीन ग्रंथात आदिवासी साहित्यांच्या जाणिवेचा पुरस्कार केला आहे. त्यांचे मते विदेशी इतिहासकारांनी आफ्रिकेच्या इतिहासाला टोळीयुध्दाचे नाव देवून आदिवासी विरूध्द कट केला आहे. अतिक्रमणवादी साम्राज्यवाद व त्याविरोधी आदिवासींचा प्रतिरोध ही वास्तवता त्यांनी साहित्यात प्रतिबिंबीत केली आहे. जी आपल्याकडे बिरसा मुंडाने १२५ वर्षापुर्वी भूमिका मांडली. कॅलाहरी ते कलाहंडी ही दोन स्थळे या ग्लोबल संस्कृतीमुळे नव्हे तर आदिवासी साहित्यामुळे जवळची वाटू लागली आहेत.

आपल्याकडे कुपोषणासाठी, मेळघाट, मोखाडा, सुप्रसिध्द आहेत. हे कुपोषण जेवढे भयावह आहे तेवढेच भयंकर आहे. आमची मोठी बहिण नजुबाई गावीत म्हणते 'आदोरच्या मशालीने मराठी नव्हे भारतीय साहित्यातला राब जाळून नवी पेरणी आणि आवणी सुरू केली आहे.' काळे गाणे म्हणणारी मरीअम मकेबा ही मोठी बहीण असेल पण सीतेनंतर भूमीतून साहित्य पिकवणारी नजुबाई ही सत्यशोधक आदिवासी विचारवंत आहे. तिच्यामुळे आदिवासी साहित्य सत्यशोधक ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महाराष्ट्रातली आदिवासी कविता आपल्या भाषेसाठी अजुनही संघर्ष करते आहे. कारण ती शहरी भाषेत बोलून उच्चभ्रू बनण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनाच त्यातला फोलपणा कळल्याने, ती आता तिच्या बोलींमधुन फुलत आहे. वाहरू सोनवणेंची भिल्लोरी, शंकरभाऊ तडवीची तडवी, डाहयाभाई वाढूची डांगी, अशी किती नावे सांगू ! यादी मोठी आहे. निव्वळ ती आपल्या बोलींमधूनच बोलत नाही तर, आपलं दु:ख वैश्विक असल्याचा प्रत्यय देते.

आदिवासी कविता ही रोजमर्रा जगण्यासोबत ती निसर्गातली प्रेम कविता जशी होते, तशी तशी व्यवस्थे विरूध्द् आक्रमकसुध्दा, प्रस्थापितांच्या विरूध्द त्यांच्या मठा -पिठा व विद्यापिठां विरूध्द हाकारा देते, वाहरू सोनवणेची कविता म्हणते :

**आमच्यासाठी बनवलेल्या स्टेजवर त्यांनी**
**बोलावले नाही**
**आम्ही गेलो नाही ...**
**प्रेक्षागारात बसलेल्या आम्ही ...**
**ते आमचंच दु:ख आम्हाला सांगत राहिले.**
**जे त्यांचे कधी झालेच नाही...**

ही भाषा जशी विद्रोहाची, तशी उपहासाची आहे. म्हणून तर नायजेरीयन आदिवासी कवी चिन्वेजू उपहासाने कवितेत म्हणतात...

**'धिज नेटिव्ह आर अनइंटेलिजंट ...**
**वुई कांट अंडरस्टॅन्ड लॅग्वेज ...**

दक्षिण आफ्रिकेतल्या आदिवासी लेखकांची भाषा मातृभाषा आहे. तर अमेरिकन - आफ्रिकी लेखकांची भाषा अॅकेडेमिक व इंग्रजी आहे. इंग्रजीतून वैश्विक स्तरावर

पोचण्यापेक्षा, आपला अनुभव वैश्विक असणं महत्वांचे नाही का ? परकी युरोपियन भाषेबद्दल इवे ओर्चर या आदिवासी कवीची अशीच धारणा आहे.

ते तर युरोपीयन बाळ
आपलं अन्न त्याला कसं चालणार ?
त्याला स्वत:चा डबा थर्मास
ते तर युरोपीयन बाळ
आपली भाषा कसं बोलणार ?
मातृभाषेला आकलनाचा त्रास
ते तर युरोपीयन बाळ
त्याला कुणाचे नाही पत्रास
त्याच्या पालक वस्त्यांवर त्याची मिजास
ते तर युरोपीयन बाळ
नेहमी कर्फ्यु शहरागत संवेदनशील
साधा ओरखडाही अनर्थ घडवील.

वसाहती भाषेचे जे लाड केले जातात, त्याचे प्रत्ययकारी वर्णन वरच्या कवितेत आले आहे. इंडीजीनस लोकांच्या निव्वळ जमिनीवरच नव्हे तर त्यांच्या संस्कृतीवर, शरीरावर, वसाहतींवर, विचारांवर कब्जा घेण्यासाठी उचल खाल्ली आहे. त्यामुळे अझानियाचा इंडीजीनस कवी पिटीका नटली आपल्या पिढीची खबरदारी कशी घेतो ते बघा ..

इन माय कन्ट्री दे जेल यू
फॉर व्हॉय दे थिंक यू थिंक
माय अंकल वन्स सेड टू मी
दे विल इम्लांट अ मायक्रोचिप
इन आवर माइंड
टू फ्लॅश अवर थॉटस् ॲण्ड ड्रीम्स
ऑन टू अ स्क्रीन ॲट जॉन वोर्स्टर स्क्वेअर
आय वॉज स्केअर्ड
बाय डे आय गार्ड माय टंग
बाय नाईट माय ड्रिम्स

ही जागरूकता जगभरच्या आदिवासींना घ्यावी लागणार आहे. कारण यापुर्वी आपण निसर्गावर ठेवावा तसा त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि भांडवली टोळधाडींनी आमच्या संस्कृतीचे पीक लुटून नेले. त्यांनी आपल्या प्रगत शस्त्रांनी आम्हाला नमवून गुलाम कसं केलं हे सांगताना आदिवासी कवी डेन्हीट डिओप कवितेत म्हणता -

द व्हाईट मॅन किल्ड माय फादर,
माय फादर वॉज प्राउड
द व्हाईट मॅन लॅडपूस्ड माय मदर,
मदर वॉज ब्युटीफुल
द व्हाईट मॅन बर्न्ड माय ब्रदर,
बिनीथ द नुनडे सन
माय ब्रदर वॉज स्ट्रॉंग
हिज हॅंडस् रेड विथ ब्लॅक ब्लड
द व्हाईट मॅन टर्न्ड टू मी
इन द कॉन्करर्स व्हाईस सेड
बॉय अ चेअर, अ नॅप्कीन - अ ड्रिंक

बिगारी बनलेला नायक आपलं मन साहित्यातून त्याने जिवंत ठेवून आपल्या पर्यन्त पोचवलं आहे. आपण आपल्या लोकांपर्यन्त पोचवू या. व्हेरीअर एल्वीन यांना फिरताना सिंगभुमला नेमकं असंच लोकगीत सापडलं. त्यांनी सॉग्ज ऑफ फॉरेस्ट मध्ये चित्रीत केलं :-

त्यांनी माझे भरले पीक नेले
त्यांनी माझ्या जमिनीवर केला कबजा
त्यांनी माझ्या शरीरावर केलं नियंत्रण

**आता माझ्या मनाला करू पाहतात दमन**
**भाऊ, त्यांना का येत नाही यश ?**

गेल्या काही वर्षापुर्वी, इंडीजीनस इयर साजरे झाले. इंडीजीनस म्हणजे मुळचे निवासी आता हे लपून राहिले नाही की, भारत सरकारने युनोला चक्क कळवून टाकले की, भारतात इंडीजीनस लोक नसल्याने असलं कांही वर्ष साजरे करता येणार नाही. परंतु काही व्यवसायिक संघटनांनी परदेशी निधीने इंडीजीनस वर्ष साजरे केले आहे. शेडयुल्ड ट्राईब्ज म्हणजे इंडीजीनीस नाही. असा सरकारी पवित्रा खरे तर इथल्या आदिवासींची फसवणूक करणारा आहे. या साहित्य संमेलनाने इंडीजीनस आयडेंटिटिचा ठराव करून तो सरकारला व युनोलाही पाठवावा आणि आपल्या देशात आदिवासींच्या नावावर, आदिवासींच्या जमिनीवर, आदिवासींच्या भाषांवर, आदिवासी हितसंबंधावर देशी व परदेशी हितशत्रुंकडून जे आक्रमण सुरू आहे त्याचा सर्वपातळ्यांवर प्रतिकार करून आदिवासींच्या अस्तित्त्वाचा जो प्रश्न निर्माण झाला त्यापेक्षा इतर प्रश्न महत्वाचे असे सांगितले जात आहे.

परंतु त्याचे विषयांतर केले जात आहे, त्यावर आदिवासी साहित्याने ठाम उभे राहणे आवश्यक आहे.

प्रसिध्द रेड इंडीयन कवी ज्वॉय हार्जो जणू याच भाषेत लिहितो -

**स्मरण करा की तुम्हीच आहात निसर्ग**
**आठवा आपल्या टोळ्यां,**
**आपली भुमी इतिहासाला साक्ष ठेवून**
**'वर्तमानाला घ्या सोबत,**
**भविष्याशी करा संवाद**
**जे जे आहे निसर्गासारखं गतिमान,**
**आठवा सर्वच्या सर्व**

ही आठवण, त्याची सजग जाणीव ठेवून कुठल्याही प्रभावापासून, आक्रमणांपासून, मुक्त अशी निर्मिती करणे व आदिवासींच्या नेपथ्य करणे हे आपल्या साहित्याचे काम आहे. कारण साहित्य हा आपल्या जगण्याचा भाग आहे. जगणे हा साहित्याचा भाग आहे. तो आदिवासी रक्तातला डोळस प्रवास आहे. बर्नी बुश हा रेड इंडीयन कवी काय लिहीतो ?

**आम्ही पाहतो, सर्व कांही कवेत घेणारी**
**स्वप्नांची क्षितिजं**
**आमच्या रक्तातून संपत नाही**
**आमची भटकंती.**

राष्ट्रीय पातळीवर खाजगीकरण आणि वैश्विक पातळीवर ग्लोबलायझेशन अशा विरोधाभासात आपण सापडलो आहोत. आधी मी म्हटल्याप्रमाणे इंडीजीनस भारतावर इतकी अतिक्रमणे झाली की, अर्धा इतिहास आक्रमणांचाच वाटावा. ही आक्रमणे जशी युध्दाची तशी सांस्कृतिक, वांशिक आणि भाषीक होती. एवढ्या आक्रमणानंतरही आपले इंडीजीनसपण टिकवले तर दुसऱ्या अंगाने आपली जमीन, संस्कृती, प्रगती आणि अभिव्यक्ती आपण गमावली आहे. आता साहित्या मार्फत ती मिळवत आहोत. हा एकविसाव्या शतकाचा भाग झाला आहे. विशेषत: विसाव्या शतकांत शेवटचं दशक हे मी माझ्या एका कवितेत सांगितल्याप्रमाणे खंडीभर वरणात मुतणांर शतक आहे. हे सर्व सर्व या दशकात वाहून गेले आहेत. आणि एकविसावं शतक वेताळासारखं माहिती युगांचं कोडं घेऊन समोर उभं आहे. संगणकाची किंवा माहिती युगाची आदिवासींना भीती नाही, आणि ती असायला नको. परंतु, त्यासाठी कार्स्पॉरावसारखी किमान संधी मिळणे आवश्यक आहे. मनुष्य एका यंत्राकडून हरला, ही गोष्टही माणसाला खरं तर सहन होत नाही.

त्यासाठी यंत्राला मन नाही. यंत्रामध्ये रक्त नाही अशा

पळवाटां शोधल्या जातात. २१ व्या शतकात किंवा नंतर माणसाचे गर्वहरण झालेच तर तो किती चांगल्या अर्थाने आदिम आहे हे सांगेल व आदिवासींना पूर्वी सारखाच उपरा करेल हा गंमतीशीर विरोधाभास आता कुमार केतकरांपासून आनंद पटवर्धन पर्यन्त सर्वच सांगत आहेत. ही चांगली गोष्ट आहे. आणखी एक चांगली गोष्ट सांगितली पाहिजे. नुकतेच मध्य भारत उर्फ नागपूर येथे जागतिक स्तरावरील आदिवासींचे उच्चभ्रू संमेलन भरले होते. या संमेलनामुळे आमच्या जीवनमानावर व आचार-विचारांवर प्रचंड परिणाम झाल्याचे वर्तमानपत्रांतून कळले. कारण या संमेलनावर लाखो रूपये खर्च झाल्याचे कळले. अर्थात आकडेवारीवरच आदिवासींचा विकास होतोय हे न कळण्या इतपत लेखक आंधळे आहेत कां ? त्यासाठी तर आता आदिवासींसाठी स्वतंत्र बजेटची तरतुद केली आहे. हे वैधानिक स्वातंत्र्य बघुन साहित्य अकादमीही खजील होईल. आणि आदिवासी साहित्याला मान्यता देईल अशी अपेक्षा विसाव्या शतकांच्या शेवटी करायला काय हरकत आहे ? कोकणी बोली भाषेला लिपी नसतांना सर्वत्र स्थान मिळू शकते. इथे तर आदिवासींच्या प्रत्येक बोलीला व्याकरण, ध्वनीशास्त्र व शब्दकोष आहे. आमच्या प्रत्येक बोलीला व्यक्तीगत नको, किमान आदिवासी साहित्याच्या संघर्षाच्या संघर्षाला जाणून घेतलं तरी पुष्कळ आहे.

आदिवासी लेखकांना जाणून घेण्यासाठी जणू साहित्याने कोडं टाकलं आहे जे की तुम्हा सर्वांना आहे. त्याचं उत्तर तुम्ही द्यायचं आहे. मी आध्वा दयाल या आदिवासी कवीच्या कवितेने माझं भाषण संपवतो आहे.

अगा दादा,
मी आताच जन्मलेला आहे
आदिवासी मुलगा
माझ्या आईच्या गर्भात उगवायचा सूर्य
ज्यावेळी मी खेळायचा खेळ
दादा, मी गळ्यावर फाशीचे व्रण व छातीवर
गोळ्यांच्या खुणा घेऊन आलो जन्माला
मी आलो जन्माला, तेव्हा आई म्हणाली
तु वारंवार का जन्म घेतोस बेटा ।
अगा दादा, मागल्या वर्षी मी पैदा झाल्यावर
लिहले होते तुम्हाला पत्र
पण पत्र येण्या आधीच मी मारलो गेलो
त्या आधीही मी लिहले होते पत्र
तुमच्या नावाने
त्या आधी, आणि त्याही आधी
याही वर्षी जन्म घेऊन लिहतोय
तुम्हाला पत्र
पत्राचे उत्तर दे, मी जाणू इच्छितो
गळ्यात फाशीच्या दोरीशिवाय आणि
छातीत गोळ्यांचा व्रण नसतांना
कसे असते जन्म घेणे ?
कसे असते श्वास घेणे ?
खुल्या हवेत, स्वतंत्र पृथ्वीवर जगणे
कसे असते ?
दादा, मला आहे विश्वास
यावर्षी तुमचा जरूर येईल जबाब.

● ● ●

## सहावे आदिवासी साहित्य संमेलन, नाशिक

# संमेलन वृत्तांत

### परिसंवाद - 'आदिवासींचा विकास आणि हितसंबंधाचे राजकारण' २४ एप्रिल १९९७

''आदिवासींसंदर्भात घटनात्मक शब्द 'अनुसूचित जाती' हा वापरण्यात येतो. त्या ऐवजी 'आदिवासी' या शब्दाला मान्यता देण्यात यावी, असा ठराव आदिवासी साहित्य संमेलनाने मंजूर करावा,'' अशी सूचना माजी मंत्री बाबुराव मडावी यांनी केली.

आदिवासींवरील ८३ टक्के पैसा आदिवासी क्षेत्रावर व फक्त १७ टक्के पैसा प्रत्यक्ष आदिवासींवर खर्च होतो, असे सांगून आठ पंचवार्षिक योजनांची इंजेक्शने मिळूनही आदिवासींचा आजार बरा झाला नाही. कारण मूळ रोगच कोणाला समजला नाही, अशी टीका त्यांनी केली.

प्रास्ताविक करताना आदिवासी विकास आयुक्तांना पुरेसे अधिकार नाहीत असे विक्रम गायकवाड म्हणाले. चर्चा भरपूर होते. मात्र आदिवासींचे प्रश्न सुटत नाहीत, असे ते म्हणाले. कम्युनिस्ट नेते कुमार शिराळकर यांनी आदिवासींच्या प्रश्नांचा सखोल आढावा घेतला. आदिवासींना भूमी, रोजगार, आर्थिक उन्नती, शिक्षण याबाबत आत्मभान यायला हवे असे ते म्हणाले.

रामचंद्र घाणे यांनी आदिवासी समाजाचे प्रश्न मांडण्यासाठी या परिसंवादात मधुकरराव पिचड उपस्थित नाहीत ही शोकांतिका आहे असे मत मांडले.

माजी आमदार नेताजी राजगडकर यांनी आदिवासींनी नेतृत्वावर विश्वास ठेवावा असा मुद्दा मांडला तर आदिवासी विकास आयुक्त शंकरराव गायकवाड यांनी आदिवासींतील ८० टक्के मुले नॉनमॅट्रीक आहेत. त्यामुळे त्यांना रोजगार मिळत नाहीत, असे सांगून आदिवासी राजकीय नेतृत्व निर्माण होण्यापेक्षा सामाजिक नेतृत्व निर्माण झाले पाहिजे असे ते म्हणाले.

### कवि संमेलन - २४ एप्रिल १९९७

पहाटच्या पहाऱ्यात, येथे आखते भूक
जिन्याची केली होळी, रे दादा
उठ दयारे दया आरोळी,
पहाटच्या पहाऱ्यात
येथे आखते भूक

मुंबईहून आलेल्या संभा भगत कवीने म्हंटलेल्या गीताने सहाव्या आदिवासी साहित्य संमेलनानिमित्त आयोजित केलेल्या कविसंमेलनाला प्रारंभ झाला अन् शब्दांचे फुलोरे फुलवित महाकवी कालिदास कलामंदिरात काव्य रजनी उत्तरोत्तर बहरत गेली.

कवि संमेलनाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती उषाकिरण अत्राम या होत्या, तर संमेलनाध्यक्ष भुजंग मेश्राम हे उपस्थित होते. कविसंमेलनाचे खुमासदार सूत्रसंचालन अरुण म्हात्रे यांनी केले. कविसंमेलनात नाशिक जिल्ह्यातील मान्यवर प्रथितयश कवीही सहभागी झाले हाद मिळवून गेली. ते म्हणतात,

कवीचा होतो आहे सन्मान
काही तरी गौडबंगाल असले पाहिजे
कवीला अजून फासावर लटकवलं
जात नाही
ही काय भानगड आहे

चौधरींच्या या कवितेबरोबरच कवी विलास गोवर्धने यांचीही कविता श्रोत्यांना अंतर्मुख करून गेली.

अजूनही कुठे काही विपरित
घडताना पाहिलं की,
मी चिडतो, रडतो, उसळतो
हे माझे दुबळेपण नाही
घोषणापत्र आहे ते माझ्या जगण्याचे

कविसंमेलनात कवितांबरोबरच चारोळ्यांनीही श्रोत्यांचे मनोरंजन केले. पद्माकर भावसार यांची चारोळी-

कावळा चिमणीच्या गोष्टीत ऐकलं
चिमणीचं घर मेणाचं असतं
गोष्टीबाहेरच्या जगात तर
चिमणीला घरच नसतं

या चारोळ्यांना श्रोत्यांनी उत्स्फूर्त दाद दिली. कवी वाहरू सोनवणे यांनीही नर्मदा आंदोलनावर एक कविता सादर करून आदिवासींच्या व्यथा, वेदना श्रोत्यांपुढे मांडल्या.

नर्मदेचं नाव घ्यावं
आणि मेधाचं नाव घ्यावं
दोघांबद्दल सारखाच
आदर वाटतो लोकांना
नर्मदेचं धरण व आदिवासीचे मरण
मेधा तडकते बिजलीसारखी.

उत्तरोत्तर रंगलेल्या या काव्यरजनीत कुसुम आलाम, श्रीराम वैजापूरकर, वीरसिंग पाडवी, गोविंद गारे, सतीश सोळांकुकर, शंकर बोऱ्हाडे, प्रताप लोके यांच्याबरोबरच श्वेताली अत्राम या चिमुरडीनेही आपली कविता सादर केली. तसेच अस्मिता गायकवाड, क्षमा गोवर्धने, निलीमा निकम, कु. गौतमी खंबाईत यांनीही आपल्या कविता म्हटल्या. कविसंमेलनात संमेलनाध्यक्ष भुजंग मेश्राम व सौ. मेश्राम हे कवी दाम्पत्यही सहभागी झाले होते.

प्रारंभी कवी अशोक सोनार यांच्या 'अलबेला' या काव्यसंग्रहाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन भुजंग मेश्राम यांचे हस्ते करण्यात आले. कविसंमेलनाला खा. कचरूभाऊ राऊत, विक्रम गायकवाड यांच्याबरोबरच असंख्य श्रोते उपस्थित होते.

## परिसंवाद - 'आदिवासींच्या आत्मसन्माची चळवळ आणि आदिवासींचे स्वशासन' २५ एप्रिल, १९९७

**सेवानिवृत्त अधिकारी अ. ध. वसावे -** ''आदिवासी विकास योजना सुरू झाल्यापासून नकळत विकास व अनुदानाच्या शब्दामुळे आदिवासी परावलंबी होत गेला. त्यामुळे गेल्या ५० वर्षात विकासाच्या नावाखाली आदिवासींच्या आत्मसन्मानाचे मापदंड बदलले. या विकास प्रक्रियेत व्यक्ती म्हणून काही माणसं मोठी झाली, परंतु व्यक्ती समाजासाठीच असते तेव्हा समाज मोठा झाला का? व अन्य समाज या आदिवासी समाजाला कसा वागवतो? असा प्रश्न आहे. आदिवासींच्या आत्मसन्मानाचा प्रश्न राजकारणाने सुटणार नाही त्यासाठी समाजप्रबोधनाची गरज आहे. स्वशासनाचा विचार करता राजकीय व आर्थिक उद्दिष्टांपेक्षा सामाजिक उद्दिष्ट्ये निश्चित असली पाहिजेत. आत्मसन्मान हा मागून मिळणार नाही तर तो मिळवावा लागेल.''

**ॲड. माधव बंडू मोरे -** ''आदिवासींनी आत्मसन्मान जपण्यासाठी आपल्या चळवळी विस्कळीत होऊ देऊ नयेत. आदिवासी हा आपल्यावरील अत्याचार निमूटपणे सहन करतो. असे केल्याने आत्मसन्मान मिळणार नाही. त्यासाठी प्रत्येकाने अन्ययाला विरोध केला पाहिजे.''

**काळूराम दोधडे -** ''आदिवासींच्या विकासाच्या

नावाने विस्थापन सुरू आहे. त्यांच्याकडे आज मागासलेले किंवा बिचारे म्हणून पाहिले जाते. त्यामुळे त्यांच्यात हिनत्व आले आहे. हे हिनत्व घालविले गेले तर त्यांचा आत्मसन्मान टिकून राहील. स्वातंत्र्यापूर्वी आदिवासी सुरक्षित होते. ब्रिटिशकाळात आदिवासींवर जेवढे आत्याचार झाले नाहीत, त्यापेक्षा जास्त स्वातंत्र्योत्तर काळात झाले. तेव्हा अत्याचार परतविण्यासाठी लेखक व कार्यकर्त्यांनी एकत्र आले पाहिजे.''

**विरसिंग पाडवी** - ''आपण आदिवासी का आहोत? आपली संस्कृती वेगळी आहे म्हणून आपण आदिवासी आहोत का? व ती संस्कृती म्हणजे नेमके काय? या इतिहासाचा शोध घेण्याची गरज आहे. ही शोधमोहीमच आदिवासींच्या आत्मसन्मानाची चळवळ ठरेल. सत्यनारायण करून व ब्राह्मणाद्वारे लग्न लावून आम्हीच आमच्या संस्कृतीवर घाला घालतो आहे. हे थांबल्याशिवाय आदिवासींमध्ये आत्मसन्मानाची जाणीव होणार नाही.''

**'सकाळ'चे संपादक उत्तम कांबळे** - ''आदिवासी वस्त्या आज मुक्त कुरणासारख्या झाल्या आहेत. तेथे कोणीही येऊन काहीही करीत आहे. त्यामुळे त्यांच्या आत्मसन्मानाला धक्का पोहोचत आहे तसेच आदिवासी भागातील नैसर्गिक साधनसुचिता खाजगीकरण व भांडवलशाहीमुळे अगोदरच दुसऱ्यांच्या हाती गेल्याने स्वशासन करणे म्हणजे अडथळ्याची शर्यत पार करण्यासारखे ठरणार आहे. आदिवासींच्या आत्मसन्मानासाठी ऐतिहासिक स्फूर्तीस्थानं जपून ती कथा-कादंबऱ्यातून पुढे आली पाहिजेत.''

**दशरथ मडावे** - ''स्वत:ला स्वाभिमानाची जाणीव होईल तेव्हाच आत्मसन्मान जागृत होऊ शकतो, आत्मसन्मान निर्माण झाला तर तो आपल्या वर्तनातून देखील दिसतो. आत्मसन्मान हा इतिहासात शोधावा लागतो. त्यासाठी गौरवस्थळे शोधून तेथे एका निश्चित तारखेला सामूहिकपणे जमल्यास आत्मसन्मानाचे स्फुल्लिंग चेतवू शकेल. स्वशासन हे आत्मसन्मानाच्या चळवळीचे शस्त्र व साधन ठरू शकेल तसेच कायद्यांतर्गत महाराष्ट्रातही सहाव्या सूचीची मागणी केली जावी.''

**कालिदास कोकणी** - ''आत्मसन्मानासाठी रामायणाच्या काळात शंबूक लढला तर महाभारतात एकलव्य लढल्याचे उदाहरण आहे. त्यामुळे आपल्यालाही त्यासाठी लढावे लागेल. पण तत्पूर्वी आपला शत्रू कोण आहे हे आपण ओळखले पाहिजे. त्याशिवाय आत्मसन्मानाची चळवळ पुढे जाणार नाही.''

**खेताडे गुरूजी** - ''आपण हक्क मिळविण्यासाठी प्रयत्न करतो, परंतु संघटित किती आहोत याचा विचार केला गेला पाहिजे. आज आपण आत्मविश्वास गमावून बसलो असून, आत्मसन्मानासाठी आपल्यातला न्यूनगंड काढून वाटचाल केली पाहिजे.''

**हरिभाऊ महाले** - ''आत्मसन्मानाची चळवळ म्हणजेच स्वत:ला स्वत:च पारखण्याची चळवळ आहे. आपला मनोभाव या चळवळीसोबत आहे की नाही हें पाहिले पाहिजे तसेच ऐतिहासिक वारसा असलेल्या स्फूर्तीस्थानांची प्रेरणा घेतल्यास आत्मसन्मानासाठी दुसऱ्याकडे जाण्याची गरज पडणार नाही व आपल्यातच जागल्याचे निदर्शनास येईल.''

## परिसंवाद - 'स्वातंत्रोत्तर काळातील आदिवासी चळवळ आणि साहित्य' २५ एप्रिल, १९९७

**कॉ. शरद पाटील** - ''दलित आदिवासींनी आपापसातील मतभेद विसरून एकत्र येण्याची गरज असून, आंबेडकरवाद्यांनी आदिवासींना बरोबर घेऊन काम केले पाहिजे. साहित्यात वेगवेगळ्या चुली मांडण्यापेक्षा स्वतंत्र पर्याय उभा करणे गरजेचे आहे. समाजात वाचण्यासाठी वाचलं पाहिजे. त्यासाठी प्रत्येकानं आत्मपरीक्षण करावे. प्रस्थापितांशी लढा देऊन समतेकडे प्रवास करताना सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.''

**डॉ. गोविंद गारे** - ''आदिवासींचे जीवन व संघर्ष यांच्या पराक्रमाच्या नोंदी साहित्यात नाहीत. आदिवासींचे नेतृत्व बिगर आदिवासी लोकांनी केल्यामुळे त्यांना त्यांच्या जाणिवा कळल्या नाहीत. स्वतंत्र आदिवासी नेतृत्व निर्माण झाले नाही त्यामुळे आदिवासी चळवळ थंडावली.''

**कविता आत्राम** - ''स्वातंत्र्योत्तर काळातील चळवळींनी समाजाचा विकास झाला नाही. पूर्ण आदिवासी समाज एकत्र येऊन चळवळ न उभारल्याने समाजाचा विकास झाला नाही. आदिवासी समाजाकडून मोठा प्रतिसाद मिळत नसल्याने चळवळी तरी कशा उभारायच्या असा प्रश्न पडतो.''

**प्रा. सतीश पिंपळगावकर** - ''चळवळींमध्ये आदिवासींचा सहभाग कमी राहिला. फक्त त्यांच्याशी संबंधित जंगल, जमीन, पाणी विषयांशी संबंधित चळवळीत फक्त आदिवासी सहभागी झाला. भाषिक अडचणींमुळे दोन आदिवासींमध्ये 'संवाद' झाला नाही.''

**उषाकिरण आत्राम** - ''आदिवासी फक्त समाज रक्षणासाठी लढत राहिला, स्वातंत्र्यासाठी प्राण देऊनही त्यांना काय मिळालं याची कुणी दखल घेतली नाही. परिणामी चळवळी मूळ धरू शकल्या नाहीत.''

**प्रा. विनायक तुकाराम** - ''आदिवासींच्या कल्याणासाठी ज्या योजना आखल्या जातात त्याचा पूर्ण लाभ आदिवासी समाजात पोहोचत नाही.''

## साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. भुजंग मेश्राम यांचे समारोपाचे भाषण -

''आदिवासी साहित्य चळवळ ही अजून बाल्यावस्थेत आहे, परंतु बालपणातच जाणीवा जागृत, निरागस व वास्तव असतात. त्यामुळे असेच लिखाण असणे आवश्यक आहे. जाणीव व नेणीव या दोन प्रकारातून साहित्य निर्मिती केली जाते. जाणीवेद्वारे विशिष्ट दृष्टिकोन ठेवून तर नेणीवेद्वारे निरागस, उत्कट भाव ठेवून साहित्य निर्मिती केली जाते. बरेच आदिवासी कवी केवळ अनुकरणातच अडकून आहेत तर काहींनी सिनेमाच्या चालीवरही कविता केल्या आहेत. याबद्दल खंत वाटते. प्रत्येक कवितेत कुठलातरी 'इजम' घालण्याचा प्रयत्न केला जातो. हा अट्टाहास यापुढे करता कामा नये. साहित्य निर्मिती करताना आपला दृष्टीकोन डोळस असावा. उत्कट असावा असेही ते म्हणाले.

आदिवासी साहित्यिकांच्या लिखाणातून निव्वळ लोकसाहित्य येत नाही किंवा केवळ निसर्गाचे निवेदन येत नही तर त्यातून राजकीय, सामाजिक निवेदनही येते. पण त्याचबरोबर त्यांनी प्रस्थापितांचा फॉर्म न स्वीकारता आपल्या मूळ भाषेतून नवीन साहित्य देण्याचा प्रयत्न करावा. प्रख्यात कवी ना. धों. महानोर त्यांच्या परिसरातील बोली भाषेवर आधारित 'जैत रे जैत' सारखं काव्य लिहू शकतात, तर आपण का लिहू शकत नाही?

आदिवासी साहित्यिकांनी मौखिक व आपल्या देशी परंपरेचे गुप्त धन बाहेर काढायला हवे. आदिवासी म्हणून आलेल्या अनुभवाचा भाग साहित्यात आलेला नाही. तो आणून जागतिक, मुख्य प्रवाहाशी आदिवासी साहित्याची नाळ जोडावी. हे करीत असताना आजूबाजूला चाललेल्या चळवळीचे भान ठेवणे गरजेचे आहे. आपली जाणीव वैश्विक होणेही गरजेचे आहे.

साहित्य संमेलनातील राजकीय व्यक्तींचा, संस्थांचा सहभाग हळूहळू कमी करायला हवा. दुर्गा भागवत म्हणतात त्याप्रमाणे साहित्य संमेलनाबाबत कर्मठ राहायला हरकत नाही. त्याचबोबर आदिवासी कवी व अन्य कवींचे वेगवेगळे कवीसंमेलन घ्यावे म्हणजे दोघातील तुलना करुन त्यांचा वकूब ओळखता येईल. लेखकांच्या कार्यशाळा घेणे गरजेचे आहे.

वनसंपत्ती आज आदिवासींकडून नष्ट केली जात असल्याचे प्रतिपादन बिगर आदिवासींकडून केले जात आहे. त्याला बांध घालून जंगल संपत्तीचा ऱ्हास रोखला पाहिजे. आदिवासींमध्ये संचय वृत्ती अजिबात नाही. त्यांना कर्जाच्या मानसिकतेतून बाहेर काढणे हे आपले पहिले कर्तव्य ठरते.''

उपस्थितांच्या आग्रहास्तव वेठबिगारांच्या संघर्षावर आधारित 'त्यांनी बोलायचं माझ्या बद्दल' व 'झांबरी सुईणीचे डोस' या दोन काव्यांनी कवी मेश्राम यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणाचा समारोप केला.

## साहित्य संमेलनामध्ये सर्वानुमते संमत करण्यात आलेले ठराव.

- देशातील आदिवासी जनसमूहांना विभिन्न नावांनी संबोधल्या जाते. राज्यघटनेत अनुसूचित जमाती असा उल्लेख आहे तर हिंदीमध्ये आदिवासींना जनजाती हा शब्द वापरला जातो. त्यामुळे आदिवासी जनसमूहांची सोशल आयडेंटीटी स्पष्ट होत नाही. तेव्हा अनुसूचित जमाती ऐवजी यापुढे आदिवासी हा शब्दप्रयोग वापरण्यात यावा.
- आदिवासींमध्ये धर्मप्रचार करण्यास बंदी घालण्यात यावी.
- विविध स्तरावरील पाठ्यपुस्तकांमधून इतिहासातील आदिवासी वीर पुरुषांची चरित्रे समाविष्ट करण्यात यावीत.
- पाठ्यपुस्तक निर्मितीच्या प्रक्रियेत आदिवासी लेखक, विचारवंत यांचा समावेश करावा.
- स्वातंत्र्यासाठी चंद्रपूरच्या तुरुंगात फासावर लटकविण्यात आलेले हुतात्मा वीर बाबूराव सेडमाके यांचे घोट जि. गडचिरोली या त्यांच्या गावाला उचित स्मारक बांधण्यात यावे.
- स्वातंत्र्योत्तर कालखंडातील थोर आदिवासी नेते, क्रांतीवीर नारायणसिंहजी ऊईके यांच्या वडसा देसाईगंज जि. गडचिरोली येथील निवासस्थानास राज्यस्मारक घोषित करण्यात यावे.
- आदिवासी जनसमूहांच्या स्वतंत्र भाषांचा संविधानाच्या आठव्या परिशिष्टामध्ये समावेश करण्यात यावा.
- राज्यात आदिवासी विद्यापीठाची निर्मिती केली जावी.

# एक आगळे वेगळे साहित्य संमेलन

**रमेश वैद्य, नाशिक**

हल्ली खुप प्रकारची साहित्य संमेलने भरतात. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन,'कोमसाप', मराठवाडा साहित्य संमेलन, विदर्भ साहित्य संमेलन, दलित साहित्य संमेलन, कामगार साहित्य संमेलन अशी एक ना अनेक साहित्य संमेलने भरत असतात. एवढेच नव्हे तर आता जिल्हावार, शहरवार साहित्य संमेलने भरायला सुरुवात झालेली आहे.

अर्थात ही साहित्य संमेलनांची सवते सुभे निर्माण करण्याची गरज आहे का नाही, या बाबतची मल्लीनाथी करण्याचे हे व्यासपीठ नाही. यांत बरेच तोटे आहेत, तसे फायदेही आहेत. नवीन नवीन लेखकांना, कविंना, सुशिक्षित असलेल्यांना वलय नसतांना आपले साहित्य , आपल्या कविता लोकांसमोर, रसिकांसमोर याव्या ही कुणाची बरे इच्छा नसणार ?-अर्थात अशा साहित्य संमेलनांना एखाद दुसराच निमंत्रित साहित्यिक येत असतो अगदी अुपदेश करून, उद्‌घाटन करून निघुन जातो. मागे उरतात ती उत्साही मंडळी, नवोदित साहित्यिक, नवोदित कवी !

निरनिराळे परिसंवाद झडत असतात, मात्र त्याबाबतची हवी तशी दखल घेतली जात नाही. अशा परिसंवादांना, अशा छोट्या छोट्या साहित्य संमेलनांना आवर्जून बोलावयाला पाहिजे ते प्रकाशकांना, पुस्तक वितरकांना कारण नुसते दोन दिवसांचे व्यासपीठ हे पूर्णतया अपूर्ण असते. कारण जनसमुदायाची ही 'शॉर्ट मेमरी' असते. त्यांना त्यांच्या साहित्य कृतीला हवे असते चिरंतनत्व, पण हा विचार संयोजक करित नाही. तसेच साहित्य संमेलन म्हटलं की असलेल्या नसलेल्या कविंची अमाप संख्या (पिक म्हंटलेले नाही) निर्माण होते. तेथे जमलेले कवी हे कवीच असतात आणि आपल्याला व्यासपीठावर केंव्हा बोलावतात, याची वाट पाहात बसलेले असतात. रसिक हे थोडेच असतात ते रसिक हे त्या त्या कविंचे नातलग, मित्र जांभाया देत 'आपला माणुस' व्यासपिठावर केंव्हा येतो याची वाट पाहात असतात. आणि तो आपले 'कर्म' आटोपून व्यासपीठावरून अुतरला की, त्या सभामंडपातुन बाहेर पडतात, हे कटू सत्य आहे. त्यासाठी अशा कवि संमेलनांना मर्यादा घालायला हव्या. त्या मानाने कथांना, कादंबऱ्यांना, मनोगतांना फार थोडा वेळ दिला जातो. ह्या बाबत ज्येष्ठांनी विचार करायला हवा.

त्याच अनुषंगाने गेल्या २४ व २५ मे १९९७ रोजी नाशिक येथे 'आदिवासी साहित्य संमेलन' भरवले होते. उद्‌घाटक, प्रमुख पाहुणे हे मान्यवर होते. त्यावेळी मात्र व्यासपीठावर आवर्जुन मोठी मान्यवर मंडळी गर्दी करून अत्यंत दाटीवाटीने बसलेली आढळली आणि ..आणि.. त्यानंतर..? त्यानंतर ह्या मान्यवरांपैकी एकानेही दुसऱ्या दिवशीही संमेलन आहे याची दखल घेतली नाही वा फिरकलेही नाही.

ज्या आदिवासींच्या उत्थापनाचा 'विडा' ह्या मोठ्या मंडळींनी उचलला होता. ते आदिवासी जेवणाच्या मंडपात आपापले जेवण घेऊन जेथे जागा मिळेल, त्या त्या ठिकाणी थाळी घेऊन आपण 'आदिवासी'च आहोत, ह्याची जाणिव ठेवित होते.

आदिवासींना ऐनवेळी मान्यवरांपुढे नृत्य करायला बोलाविले; पण तेथे काय काय घडणार आहे, कशासाठी बोलाविले आहे ह्याची कुठलीही कल्पना त्यांना दिली गेली नाही. ज्या आदिवासींनी आपला विकास व्हावा, आपल्या व्यथा शहरी जनतेपर्यंत पोहोचवाव्या, शासन दरबारी आपली दाद लागावी म्हणून ज्यांना निवडून दिले, तेच आमंत्रण देऊनही मंत्रिगणांपैकी श्री. विजयकुमार गावित, शहराचे पहिले नागरिक श्री. वसंतराव गिते हे अनुपस्थित राहावे ह्या सारखे आदिवासी साहित्य संमेलनाचे दुर्दैव ते कोणते ?

खरं म्हणजे माणसाला पैसा नको, मानसन्मान नको, हवी असते ती कौतुकाची पाठीवरील थाप ! पण... पण ही थाप देण्यासाठी आपली खुर्ची, आपली लाल दिव्याची गाडी फिरविण्यास हवी. मंत्री गणांनी धन्यता मानावी, ह्या ऊपर ह्या आदिवासींचे दुर्देव ते दुसरे कोणते ? हे ह्याच समाजातुन पुढे आलेले आदिवासी मंत्री हे जसे 'दलितांमधील ब्राम्हण' असतात, तसेच हे 'आदिवासीं मधील ब्राम्हण' होण्याच्या मार्गावर आहेत, हे विसरून चालणार नाही.

आदिवासींचे साहित्य संमेलन दोन दिवस भरवुन नंतर 'हुश्य' म्हणून बसणे योग्य आहे ? ह्या आदिवासी लोकांची व्युत्पत्ती, उगमस्थान याबद्दल ऊहापोह व्हावयास हवा. आजही त्यांनी आपली संस्कृती जपलीय, हे तथाकथित संस्कृती जपणाऱ्यांनी ध्यानांत घ्यावयास हवे.

नाशिक जिल्ह्याचा विचार केला तर पेठ, सुरगाणा ह्या भागांत फिरावे. निरनिराळे पाडे आहेत, जेथे अजुनही पाणी नाही, रस्ते नाही, वीज नाही, खाण्यासाठी महुची फुले, नागलीची लाल भाकरी आणि पिण्यासाठी महुची दारू ! काय करणार ? पाच वर्षानंतर येणार हे 'लोक प्रतिनिधी' जोगवा मागायला. खरं म्हणजे त्यांच्या जवळ देण्यासाठीही काही नसतं : बरोबर ह्या तथाकथित लोक प्रतिनिधींनी बरोबर पाण्याच्या पॅक बाटल्यांचे क्रेटस्, खाण्यासाठी भरपूर खाद्य, फक्त घ्यायच्या त्या आदिवासींच्या कोंबड्या, शेळ्या आणि त्यावर ताव मारून,त्यांच्या 'मुखिया'ला प्रलोभन दाखवुन पदरांत मते पाडून घेऊन, निवडून आल्यावर निरनिराळ्या सवलती उपटून शहरांत पुढच्या ३/४ पिढ्यांची व्यवस्था करून ठेऊन सुखासिन दिवस घालवायचे. मग तो कोण आदिवासी ? कोण मतदार ? तो कुठे राहतो ? कसा खातो ? कशाला तो फिकीर करेल ?

आज आपण आपल्या जवळ असणाऱ्या शहरी सुखसुविधांचा उपभोग घेता घेता, शिकण्याच्या सोयी पदरात पाडून घेता घेता ह्या आदिवासींचा आपल्याला पूर्णपणे विसर पडलेला आहे.

आणि अशातच ह्या सर्व सुखसुविधा, वैभव, स्वत:चे उच्च शिक्षण, स्वत:चे उच्च घराणे ह्याला ठोकर मारून गोदाराणी (गोदावरी परुळेकरर) मेधा पाटकर, अनुताई वाघ ह्या सारख्या स्त्रिया कधी पुरूष ह्या आदिवासींच्या दु:खाची, कष्टाची, जाणिव ठेऊन स्वत:ला त्यांच्यातल्याच एक समजुन झोकुन देतात. आणि मग अशा व्यक्तींसमोर आपण शहरीच काय, पण ही आदिवासी मंडळी नतमस्तक होतात.

वास्तविक गोदाराणींचे माहेर, सासर श्रीमंत, मेधा पाटकर तर टाटा मुलभूत संशोधन संस्थेत उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडलेली... पण.. सरधोपट उच्च वेतनाच्या नोकऱ्या, मानमरातब धुडकावुन आज ह्या पाड्यावर तर उद्या त्या पाड्यावर, असे आदिवासींचे जीवन आदिवासी होऊन जगताहेत/जगतो आम्ही, मग साहित्य निर्माण होते. 'ऽ माणूस जागा झाला' पण अशा माणसांना / व्यक्तिंना अ. शहरी माणसं वेडेपीर म्हणतो. मग खरोखर डोळे मिटू विचार येतो की वेडे आपण की ही माणसे ?

आदिवासी साहित्य संमेलन भरवायचे असेल तर ह्या आदिवासींना व्यासपिठावर बसवा / बोलवा. त्यांच्या रोजच्या जीवनांत घडणाऱ्या घटना त्यांच्या कडून वदवुन घ्या ! आणि मग पहा... त्याला आत्मनिवेदन म्हणा, मनोगत म्हणा, चरित्र म्हणा, जीवन म्हणा... ते तसेच्या तसे चित्रित करा. ते साहित्याच्या कुठल्याही निकषांवर तपासून न पाहाता प्रकाशकांनी ते छापावे. यापासून मिळणारे उत्पन्न ह्या आदिवासींच्या विकासासाठी उपयोगी आणि यातुनच मग एखादा उद्याचा पेंडसे, शिरवाडकर, माडखोलकर, अत्रे निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. असा नम्र विश्वास वाटतो.

फक्त विचार येतो, ही आदिवासी साहित्य संमेलने व्हावीत... पण...पण ही 'आळवावर पाणी ठरू नये', हीच प्रामाणिक इच्छा !

● ● ●

# आदिवासी माणूस आहे, वस्तू नव्हे

**- वाहरु सोनवणे**

आदिवासी साहित्य चळवळीची आजची अवस्था लक्षात घेता, भारतातील सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक जीवन समजून घेऊन तिची दिशा ठरवून फुलवण्याच्या दिशेने वाटचाल करीत असताना, तिच्यातील जिवंतपणा काढून घेणाऱ्या, गिळंकृत करणाऱ्या, थोपवून धरणाऱ्या शक्तीही अस्तित्वात आहेत. हे सर्व साहित्यप्रेमींनी ओळखले पाहिजे. या शक्ती कोणत्या आहेत हे आपण ओळखून पुढे सावध असले पाहिजे. जागतिक पातळीवर कार्ल मार्क्सची वर्ग लढ्याची चळवळ, दक्षिण आफ्रिकेतील नेल्सन मंडेलाची काळ्या निग्रोंच्या हक्काची चळवळ, भारतातील फुले-आंबेडकरांनी उपेक्षितांसाठी चालवलेल्या परिवर्तनवादी चळवळीचा ऐतिहासिक वास्तववादी अनुभव असाच आहे.

आज आदिवासी समाजावर वेगवेगळ्या धर्माचा, पंथांचा, संस्कृतीचा, राजकीय पक्षाचा, संघटनांचा प्रभाव आहे. आदिवासींचा देश पातळीवरचा एकच एक असा धर्म नाही, पंथ नाही, पक्ष नाही आणि संघटनाही नाही. म्हणून आदिवासी चळवळीला दिशाही नाही, वैचारिक बैठकही नाही. देशाच्या वेगवेगळ्या विभागात ज्या धर्माच्या, पक्षाच्या आणि संघटना इत्यादींच्या प्रभावाखाली जो आदिवासी गेला आहे. तो आदिवासी त्यांच्याशी इमान राखून आपले जीवन जगताना दिसतो. मानवी मूल्यांचा आधार घेऊन जगणारा आदिवासी समाज विस्कळीत झालेला आहे. विभागला गेलेला आहे. कोणी हिंदू धर्म म्हणतो, कोणी ख्रिश्चन धर्म म्हणतो तर कोणी मुसलमान म्हणतो. प्रत्येक धर्मवाले आपल्या ताब्यातील आदिवासींवर जोरदारपणे आपला प्रभाव जमवत आहेत, जमवत असतात. त्यांची संस्कृती व संस्कृतीची मूल्यं आदिवासीत रुजवत असतात. आदिवासींच्या मनामध्ये भरवत असतात. राजकीय पक्ष सुध्दा 'आम्ही तुमचे प्रश्न सोडवू, तुमचा विकास करू' असे सांगून त्यांच्या ध्येयासाठी आदिवासींना वापरून घेत आहेत. त्यांचा कर्मठ विचार आदिवासींच्या मनात एवढा ठासून भरवत आहेत की, ते इतके कडवट बनतात की, आपले राजकारण आणि धर्मकारणाचं संरक्षण करण्यासाठी जीव द्यायला तयार होतात आणि मग अशा स्थितीत आदिवासीच आपसात भांडतात.

एकमेकांच्या जीवावर उठतात. पण हा सगळा व्यवहार करीत असताना आदिवासी एक कळसूत्री बाहुलीप्रमाणे वागत असतो. या संघर्षाचा निर्णय आदिवासी घेत नसतो तर याचा निर्णय हितसंबंधी धर्म पंडित व हितसंबंधी पक्ष घेत असतो आणि लढायला मात्र आदिवासी सज्ज असतो. वर्चस्ववादी संस्कृतीला बळी पडणाऱ्या, भेदाभेदीच्या आणि चुकीच्या प्रभावातून आदिवासींना बाहेर काढून मानवी मूल्यांवर आधारित संस्कृतीशी नातं जोडून घेऊन आणि अंध विश्वासांवर आधारित जीवन फेकून देऊन आदिवासी जीवनातील मानवी मूल्यांवर प्रकाश टाकत मानव मुक्तीच्या लढ्याशी जोडून घेतले पाहिजे. आदिवासी समाजावर असलेल्या संस्कृती, धर्म, पक्ष यांच्या प्रभावातून आदिवासींना मुक्त करायचं असेल तर आदिवासी हा एक माणूस आहे, वस्तू नाही, असा दृष्टिकोन घेऊन आदिवासींचे दैनंदिन जीवनातील प्रश्न सोडवत विकास साधायला हवा.

आदिवासींचे आर्थिक, राजकीय प्रश्न सोडवत असताना आदिवासीला मानवी प्रतिष्ठेची लढाई लढवावी लागेल. आदिवासींचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आदिवासीच पुढे आला पाहिजे. यासाठी आदिवासी 'स्वावलंबी' कसा होईल, याचा विचार करून आदिवासी चळवळींची दिशा निश्चित केली पाहिजे.

आदिवासींच्या स्वभावातच इमानदारी आहे. वर्चस्ववादी नसलेला, प्रेम आणि विश्वासावर जीवन जगणारा असा आदिवासी समाज आहे. पण वर्चस्ववादी धर्म आणि

राजकीय पक्षांशी संस्कृतीचा परिणाम आणि प्रभाव आदिवासींवर असल्यामुळे आदिवासीच आदिवसींविरुध्द लढताना दिसतो. आदिवासीच आदिवासींना लुटताना दिसतो. धर्म व पक्षांची संस्कृती व्यक्तीवादावर, व्यक्तीहित जपणारी, शोषण करणारी, वर्चस्व गाजवणारी आहे.

आदिवासींचे प्रश्न सोडवण्यासाठी, आदिवासींना सुधारण्यासाठी, आदिवासींचे कल्याण व विकास करण्यासाठी देशाच्या आदिवासी पट्ट्यात वेगवेगळे धर्म प्रचारक, धर्म प्रसारक,राजकीय पक्ष, संघटना, संस्था इ. काम करीत आहेत. आदिवासीत काम करणाऱ्यांची गर्दी झाली आहे.

आदिवासींचे प्रश्न सोडवत असताना त्या त्या ठिकाणी किंवा त्या त्या चळवळीत आदिवासी कार्यकर्त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. प्रत्येक क्षेत्रात आदिवासी सैनिकांचेच काम करतो. कोणत्याही ठिकाणी सेनापतीची भूमिका बजावताना दिसत नाही. आदिवासींना ते स्वातंत्र्य दिलेही जात नाही. धर्म व पक्षासाठी हे कर्तव्य केलेच पाहिजे, असा शिस्तीचा बडगा दाखवून आदिवासीला राबविले जाते. राजकीय पक्षाची अशी भूमिका असते की, आदिवासी समाजाने कायमस्वरूपी आमच्यावर म्हणजेच पक्षावर अवलंबून रहावे, कोणत्याही प्रश्नासाठी आम्हालाच विचारलं पाहिजे. आम्ही सांगू तसेच वागले पाहिजे नाही तर तुम्ही पक्षद्रोही आहात, असा आरोप करून आदिवासीला हिणविले जाते, त्याची मानहानी करून त्याला जीवनातून उठवायचा प्रयत्न होतो, अशा भूमिका असल्यामुळे अशा या पक्षात राहून आदिवासीला स्वावलंबनाची लढाई जिंकता येणार नाही. आदिवासी दैनंदिन प्रश्नांसाठी त्या त्या पक्षांवर अवलंबून असतो. म्हणून अनेक न पटणाऱ्या गोष्टी आदिवासी पचवत असतो. सहन करीत असतो आणि म्हणून आदिवासींचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांचा विकास करण्यासाठीचा निर्णय आदिवासीने स्वत: घेतला पाहिजे.

*(दै. गावकरीच्या सौजन्याने)*

## आदिवासी साहित्य संमेलने

| अ. क्र. | आदिवासी साहित्य संमेलनाचे वर्ष | साहित्य संमेलनाचे अध्यक्ष | साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक | संमेलनाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | १०, ११ नोव्हें. १९७९ | श्रीकृष्णमूर्ति मिरमिरा | आ. प्रा. यशवंत मनोहर | भद्रावती, जि. चंद्रपूर |
| २. | २३, २४ मे १९८२ | डॉ. रावसाहेब कसबे | डॉ. यशवंत शेरेकर | वणी, जि. यवतमाळ |
| ३. | ६, ७ जून १९८७ | डॉ. गोविंद गारे | - | किनवट, जि. नांदेड |
| ४. | २७, २८ जाने. १९९० | श्री. लक्ष्मण माने | श्री. लक्ष्मण गायकवाड | नंदुरबार, जि. धुळे |
| ५. | २३ - २५ डिसेंबर १९९० | श्री. वाहरु सोनावणे | श्री. बाबुराव बागुल | पालघर, जि. ठाणे |
| ६. | २४, २५ एप्रिल १९९७ | श्री. भुजंग मेश्राम | श्री. पी. ए. संगमा | नाशिक |

# आदिवासी विकास : दशा आणि दिशा

- दादासाहेब बिडकर

महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, ठाणे, चंद्रपूर, गडचिरोली, जळगाव, अहमदनगर, नागपूर, अमरावती, यवतमाळ, नांदेड या जिल्ह्यात आदिवासींची वस्ती आहे. ठाणे, नाशिक व धुळे या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात व चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात एकत्रित व काही भागात विखुरलेली आहे. अहमदनगर, रायगड, नांदेड, अमरावती, जळगाव व पुणे जिल्ह्यात एकेका तालुक्यातच ही वस्ती आहे.

या सर्व विभागात जे आदिवासी आहेत त्यात निरनिराळ्या जमाती व निरनिराळ्या भाषिक गटात व आचार विचारात विभागलेल्या आहेत. बहुसंख्य आदिवासी शेतीत आहेत व काही जमाती फक्त शेतमजूरच आहेत. त्यामुळे शेतीमालक व शेतमजूर या दोघांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक परिस्थितीत मोठी तफावत आहे. या सर्व जमाती डोंगराळ व जंगल भागांतच सामावलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात बरेच अंतर आहे. शासनाच्या जंगलविषयक धोरणाने डोंगराच्या व जंगलाच्या सानिध्यात राहाणारा हा आदिवासी समृध्द झाला नाही. डोंगर उजाड झाले व जंगले नष्ट झाली व शेतीही निकृष्ट झाली. कै. वांद्रेकर, मोरारजी देसाई, कै. भाऊसाहेब हिरे यांचे मंत्रिमंडळ १९४६ मध्ये त्यावेळच्या मुंबई राज्यात होते. ठाणे जिल्ह्यात कै. नानासाहेब ठकार, कै. बाळूभाई मेहता, कै. जयवंतराव नटावदकर, जळगाव जिल्ह्यात कै. धनाजी नाना चौधरी, नाशिक जिल्ह्यात श्री. दादासाहेब बिडकर या मंडळींनी सेवाभावी संस्था निर्माण करून आदिवासींच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष खेचले. त्यावेळी विदर्भाकडे व मराठवाड्यात असलेल्या आदिवासी भागात सेवाभावी संस्था नव्हत्या. म्हणून त्या भागातील आदिवासी उपेक्षितच राहिला. सर्व महाराष्ट्र एकत्र आल्याबरोबर या आदिवासी सेवाकार्यात झपाट्याने वाढ झाली. शेती सुधारणा व पूरक उद्योग याकडे झपाट्याने बदल झाला. त्यादृष्टीने निरनिराळ्या कायद्यात व धोरणातही बदल झाला. कूळ कायदा, आदिवासी जमीन हस्तांतर बंदी कायदा, जमीन सुधारणा नियम हे अंमलांत आणण्यात आले. आदिवासींसाठी आश्रमशाळा,छात्रालये, औषधोपचार व प्राथमिक आरोग्य केंद्रे, जमीन सुधारणा व बागाईत क्षेत्र वाढीसाठी प्रत्येक पंचवार्षिक योजनेत मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद करण्यात आली व त्याचा परिणाम हळूहळू दिसू लागला आहे. शिक्षित मुले व मुली आरक्षणामुळे निरनिराळ्या शासकीय व अशासकीय सेवेत आल्या आहेत.

### डांग सेवा मंडळाचे कार्य

डांग सेवा मंडळ, नाशिक ही संस्था १९३७ साली स्थापन झाली. त्यावेळी कोठेही रस्ते नव्हते. शाळा नव्हत्या. जागृती नव्हती. औषधोपचाराची सोय नव्हती. आज ही परिस्थिती बदलली आहे. मोठ्या प्रमाणात आश्रमशाळा व छात्रालयाद्वारे शिक्षणाची दारे खुली आहेत. शेती सुधारणा, बागाईत क्षेत्रवाढ सुरू आहे. शासनही निरनिराळ्या योजनांसाठी संस्थांना अनुदान व मदत करीत आहे.सेवाभावी संस्थांना शासनाचे सर्व बाबींवर मिळणारे अनुदान अपुरे आहे. सेवा योजनांची पूर्तता करण्यासाठी लागणारी मदत इतरत्र बाहेरून मिळणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. स्वतंत्रपणे कार्य करणारे प्रामाणिक कार्यकर्ते कमी आहेत. सरकारी योजना व अनुदान मिळत आहेत पण या सेवा क्षेत्रात प्रशिक्षित कार्यकर्ते उपलब्ध नसल्यामुळे कामात गती येत नाही. अशा कार्यकर्त्यांना इतर क्षेत्रात ज्या सवलती आहेत त्या त्यांना उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, आदिवासी सेवाकार्यात कार्यकर्त्यांस पूर्वीची प्रतिष्ठा होती

ती लोप पावत आहे. आदिवासी सेवेत असलेल्या संस्थेचा कोणत्याही शासकीय प्रकल्पाशी संबंध येत नाही.

सर्व सेवाकार्य शासनाने व्यापून टाकले आहे. संस्था जर स्वतंत्रपणे एखादा प्रकल्प राबवेल तर त्या प्रकल्पात शासन मदत करेल याची खात्री नाही. आदिवासींचे अनेक प्रश्न आहेत. ते समजून घेऊन त्यावर उपाययोजना करणे जरूरीचे आहे. संस्थांना सामाजिक मदत करण्यास या सेवा कार्यात इतर कोणी पुढे येत नाही. संस्थेचे सर्व कार्य दुर्गम व अविकसित भागात असल्याने ते इतर जनतेच्या लक्षात येत नाही. आमची मुख्य अडचण कार्यकर्त्यांची आहे. आदिवासींचे प्रश्न समजून घेऊन त्या बाबतीत चिंतन करणारे कार्यकर्ते आज हवेत. शिक्षण, शेती सुधार व ग्रामीण उद्योग या बाबतीत प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.

## आदिवासी उपयोजना

केंद्र सरकारने आदिवासी विभागात निरनिराळ्या योजना स्थानिक परिस्थितीप्रमाणे राबविण्यासाठी निरनिराळ्या राज्यात जेथे मोठ्या प्रमाणात आदिवासी वस्ती आहे त्या भागासाठी आदिवासी उपयोजना सुरू केली आहे. या उपयोजना भागात शिक्षण, शेती, पशुपालन, शेतीपूरक उद्योग व ग्रामीण उद्योग व त्यासाठी मदत हे काम हाती घेतले आहे. ही सर्व कामे शासकीय व राजकीय तंत्रावर चालतात. सार्वजनिक संस्थांच्या कार्यकर्त्यांचा योजना ठरवताना सहभाग नसतो. आदिवासी आमदार, खासदार व जिल्हा व पंचायत समिती स्तरावरचे लोकप्रतिनिधी योजनांतर्गत कोणती कामे करावयाची, कोणते लाभार्थी निवडावयाचे व कोणास कोणती मदत द्यावयाची हे ठरवतात.

त्यामुळे जो अगदीच गरीब आहे त्याला या योजनांचा लाभ होत नाही. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शेकडो गावांना व त्यातील रहिवाशांना कोणतीही लाभार्थी योजना नाही. काही गावे व व्यक्ती अशा आहेत की, त्या गावात व व्यक्तींना अनेक लाभदायी मदत योजना मिळाली. आदिवासी उपयोजना समितीत वरपासून खालपर्यंत फक्त निवडून आलेले लोकप्रतिनिधी आहेत. शिक्षणासाठी शिक्षणतज्ज्ञ, शेती सुधारणेसाठी शेतीतज्ज्ञ, ग्रामीण उद्योगासाठी त्या विषयातील तज्ज्ञ, रस्त्याची कामे, बांधकामे यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त त्या धंद्यातील तज्ज्ञ, औषधोपचार व आरोग्य, स्वच्छता या कामासाठी कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर तज्ज्ञांचीही मदत घेणे जरूरीचे आहे. ते आज होत नाही. शासकीय कर्मचारी व तथाकथित राजकीय लोकप्रतिनिधी यांच्या व्यतिरिक्त समाजात जे निरनिराळ्या विषयातील तज्ज्ञ आहेत त्यांचा सल्ला व मदत घेण्याची आवश्यकता आहे. दरवर्षी शेकडो कोटी रुपये आदिवासी उपयोजना क्षेत्रावर खर्च झाले आहेत व होत आहेत त्याचा लाभ गरिबास फारसा झाला नाही. आदिवासी उपयोजना क्षेत्रात व क्षेत्राबाहेर शेतमजूर, निरक्षर व उद्योग नसलेले २५ ते ३० टक्के आदिवासी आहेत. त्यांची संख्या लाखांनी आहे.

## लाभार्थींचे मूल्यांकन हवे !

गेल्या १५-२० वर्षात आदिवासी क्षेत्रात निरनिराळ्या योजनावर किती खर्च झाला आहे व त्याचा लाभ किती व कोणत्या लाभार्थींना मिळाला आहे याचे मूल्यांकन व सर्वेक्षण होण्याची आवश्यकता आहे.

नर्मदा सरोवर प्रकल्प किंवा इतर सर्व धरणांचे प्रकल्प डोंगराळ भागातच झालेले आहेत. डोंगरात राहणाऱ्या रहिवाशांना पाणलोट क्षेत्रातून इतरत्र जावे लागते. त्यांना दूर कोठेतरी त्यांच्या वसाहती होतात. विस्थापितांना त्यांचे समाधान होईल अशी परिस्थिती आजवर निरनिराळ्या धरण क्षेत्रातील रहिवाशांना मिळालीच नाही व बहुसंख्य विस्थापित हे आदिवासीच आहेत. सर्वांना चांगली जमीन, घरे, शाळा, औषधोपचार, रस्ते व इतर सोयी अद्यापही उपलब्ध झालेल्या नाहीत. मोठ्या धरणांच्या प्रकल्पाचा फायदा विस्थापितांना मिळालाच नाही.

### पुनर्वसनाचे काय?

महाराष्ट्रातील सर्व मोठी व मध्यम धरणे डोंगराळ भागातच आहेत. सर्व धरणांचे पाणलोट क्षेत्र हा डोंगराळ विभागच आहे व त्या सर्व भागात सर्व ठिकाणी आदिवासींचीच वस्ती आहे. धरणाची जागा व त्याच्या पाणलोट क्षेत्रात राहाणाऱ्यांना निरनिराळी आमिषे दाखवून प्रसंगी कायद्याचा आधार घेऊन दमदाटीने व जबदस्तीने तेथून हुसकावून लावले आहे. आज त्यांचे हाल होत आहेत.

आश्वासने दिल्याप्रमाणे या विस्थापितांचे पुनर्वसन झालेच नाही. शेकडो कुटुंबे देशोधडीस लागली आहेत. आदिवासी हा गटाने राहाणारा माणूस आहे. त्याला एकटा ठेवून त्याचे पुनवर्सन होऊ शकत नाही. या धरणामुळे मिळणाऱ्या पाण्याचे जे लाभार्थी आहेत त्याचेच शासनाने संरक्षण केले आहे. मात्र पाणलोट क्षेत्रातील विस्थापितांना कायद्याचे कोणतेच संरक्षण नाही. धरणाच्या पाण्यामुळे ज्याच्या जमिनी बागाईती झाल्या आहेत ते आनंदात आहेत. पण विस्थापितांना दिलेल्या जमिनी निकृष्ट प्रतीच्या आहेत व अद्याप ते दारिद्र्यावस्थेतच आहे. ज्यांच्या जमिनीला पाणी मिळते त्यांच्या जमिनीतील काही भाग कायद्याने काढून घेऊन तेथे हे विस्थापित प्रस्थापित केले पाहिजेत व तेही एकएकटे नव्हे तर गटागटाने. तरच त्यांचे संरक्षण होईल.

आदिवासींसाठी राज्याचे अंदाजपत्रकात (बजेटमध्ये) जो निधी उपलब्ध करुन दिला आहे. तो फक्त आदिवासी उपयोजनाअंतर्गत असलेल्या अदिवासींनाच मिळतो. आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर जे लाखो आदिवासी निकृष्ट जीवन जगत आहेत ते या मदतीपासून वंचित आहेत. त्यांच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. आदिवासी विकास खात्याचे त्या लाखो आदिवासींच्या विकासाबाबत दुर्लक्षच आहे. ही अतिशय चिंतनीय बाब आहे. ज्याला जमीन आहे त्याला शेतीविषयक सर्व लाभ मिळतात. त्यांचीच मुले मुली शिकतात. नोकरीस लागतात. पण ज्या आदिवासीला जमीन नाही त्याला कोणता लाभ मिळणार? त्याची मुले-मुली शिकत नाहीत व तीही मोठेपणी मजूरच राहतात.

निरनिराळ्या ठिकाणी असलेल्या आश्रमशाळेत दाखल झालेल्या मुला-मुलींची पाहाणी केल्यास ९० टक्के मुले-मुली ज्यांच्याजवळ शेती आहे त्यांचीच आहेत. जो शेतमजूर आहे त्याची मुले व आश्रमशाळेत अतिअल्प प्रमाणात आहेत. या निमित्ताने अशी पहाणी होणे आवश्यक आहे. हे शेतमजूर फार काही मागत नाही. पोटभर अन्न, मुलांना शिक्षण, कायम उद्योग व मजुरी, आरोग्य व राहावयास नीटसे लहानसे घर.

### साहित्यातले चित्रणही उपेक्षितच आहे !

आदिवासींच्या जीवनावर कोठेही कथा कादंबऱ्या, काव्य व साहित्य आढळत नाही. त्यांच्या जीवनाचे दर्शन घडवणारे चित्रपटही नाहीत. त्यांच्या लोककथा, लोकगीते, कोणी एकत्र म्हणत नाहीत. त्यामुळे त्यांच्यात लोककवी आहेत. पण त्यांची उपेक्षाच आहे.

या आदिवासी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने जे लेखक व कवी एकत्र जमून जे विचारविनिमय व चर्चा करणार आहेत. त्यांनी या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. निरनिराळ्या आदिवासी जमातीत जी लोकगीते व लोककथा आहे ती एकत्र करण्याची आवश्यकता आहे. ते काम या साहित्य संमेलनाने करावे ही अपेक्षा.

*(दै. गावकरी यांच्या सौजन्याने)*

● ● ●

# आदिवासी स्वायत्ततेची चळवळ

**- एल. के. मडावी**

**स्वतंत्र भारतातील आदिवासी गुलाम -**

भारताचा इतिहास, हा आदिवासींना वगळून इतिहास होवूच शकत नाही. परंतु त्याला इतिहास शुन्य बनविण्याचे प्रयत्न सर्वस्तरावरून केले जात आहे. भारत भूमीवरचा निसर्गताच नागरीक असलेला आदिवासी स्वातंत्र्याच्या ५० वर्षानंतरही स्वतंत्र भारतातील गुलाम असून, त्याला स्वातंत्र्याची अनुभूती शुन्य आहे. आज तो आपल्या स्वशासनांचे / स्वातंत्र्याचे अधिकार मागतो आहे. त्यांचा सहज प्रश्न आहे की, भारताला स्वातंत्र्य मिळाले हे कोणी कोणी वाटून घेतले ? राज्यकर्ते बदलले म्हणजे आम्ही स्वतंत्र झालो काय ?

स्वातंत्र्यापूर्वी, अशी ओरड होती की, इंग्रज आमच्यावर भयंकर अन्याय अत्याचार करून आमचे शोषण करीत आहेत. आपण ''स्वातंत्र्य मिळविणे हा माझा जन्म सिध्द हक्क आहे'' ही सारी बोंब मारीत होतो, प्रत्येक तळागाळातील माणसांची, आपल्या मातृभूमीचे संरक्षण करण्याची जबाबदारी समजत होतो. मात्र या देशातून इंग्रज गेल्यानंतरही आदिवासींच्या संदर्भात परिस्थिती तशीच कायम आहे. फक्त राज्यकर्ते बदलले आहेत. आज वस्तुस्थिती अशी आहे की, स्वातंत्र्याचे गोडवे गाणारेच आदिवासींचे शोषण करीत आहेत.

स्वातंत्र्याच्या ५० वर्षानंतर, सुवर्ण जयंती साजरी करताना आदिवासी माणूस, जनगणनेच्या यादीत समाविष्ट होत नाही. त्याला आपण कोणत्या देशात राहतो, त्या देशाचे नाव, राष्ट्रपती, राष्ट्रगीत, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री (राज्याचा), किंवा जिल्ह्यांचा जिल्हाधिकारी वगैरे काहीच माहित नाही. त्याला दोन वेळेची भाकर देणारा मालक व जंगलात राहणाऱ्या आदिवासींना नक्षलवादी, शोषणकर्ते ठेकेदार व पोलीसांची नांवे माहीत आहे. भारताच्या राष्ट्रगितामध्ये या भूमीवरचा मूळचा रहिवासी असलेल्या आदिवासी माणसांची, त्यांच्या शौर्याची, संस्कृतीची व त्यांच्या अस्तित्वाची दखलच घेण्यात आली नाही. त्याला या देशात दुय्यम नागरिक म्हणून वागविले जाते. आदिवासींची हजारो बालके कुपोषणाने मरत आहे. दुर्गम भागात राहत असलेल्या आदिवासींच्या जिविताची, संरक्षणांची त्यांच्या अब्रूंची रक्षा करण्याऐवजी, त्याचा पूर्णत: नायनाट कसा करता येईल, यासाठी त्यांच्यावर 'टाडा' सारख्या कायद्यांचे प्रयोग करून, त्याला वनवासी, जंगली, अमानवी बनविण्यात येत आहे. वनवन भटकून कंदमुळे शोधतो, नंगा, भूका, बेघर होवून, आज आदिवासी माणूस आपली अस्मिता शोधतो आहे. आपले हरविलेले माणूसपण शोधण्यांची धडपड करतो आहे. जन्मताच त्याला मिळालेले जल, जमीन, निसर्ग संपत्तीचे, आणि आपल्या मूळपणांचे अधिकार मागतो आहे. आपणही माणूस आहो, माणूस म्हणून सहानुभूतीने पहावे अशी अपेक्षा करतो आहे, तो जीवन जगण्याची समान संधी मागतो आहे. स्वातंत्र्याची सुवर्ण जयंती साजरी करताना आदिवासी माणूस गुलामीत्वाला समूळ नष्ट करण्याचा टाहो फोडतो आहे.

या भूमीचा असलेला मालक, मूळनिवासी, हजारो वर्षापासून अमानुष छळातून जीवन कंठीत जगत असताना आज तो भारत देशाला स्वातंत्र्याची ५० वर्षे पूर्ण झाल्याबाबत, आपले दु:खद अंतकरण, एकदम साचून ठेवलेल्या पाण्याला, धो-धो प्रवाहात सोडावे यासारखे आपल्या दाटलेल्या मनास मुक्त करून म्हणतो की, ''माझा भारत महान, राष्ट्रभिमान उराशी बाळगून, स्वातंत्र्यदिना निमित्ताने, आपली सद्भावना व्यक्त करतो. हे स्वतंत्र देशा, मी उपवाशी राहतो, नंगेपणाने जीवन जगतो, बेघर होवून वनवन भटकतो, आमची बालके कुपोषणाने मरतांना उघड्या डोळ्यांनी पाहतो, आमच्यावर टाडा लावून, आमची इज्जत लुटताना पाहतो, किड्यामकोड्या सारखे आमच्या स्वकीयांना मारताना पाहतो. पण काहीही हरकत नाही, माझ्या स्वतंत्र देशा ! स्वातंत्र्याचा आम्हलाही

अभिमान आहे, आज तुला स्वातंत्र्याची ५० वर्षे पूर्ण झालीत, या सुवर्ण जयंतीच्या निमित्ताने तुला कोटी-कोटी प्रणाम !''

## स्वायत्तता चळवळ : आदिवासींची की, अनुसूचित जमातीची !

भारतीय घटनेने स्वायत्तता (Autonomus) ही संकल्पना राजकीय स्वातंत्र्य किंवा स्वयंशासीत राज्य, भूमिका अधिक स्पष्ट होणे आवश्यक आहे. 'स्वायत्ता' म्हणजे आदिवासींना दिलेले पूर्ण स्वातंत्र्य, असा अर्थ, ज्या त्या प्रदेशाला दिलेल्या स्वायत्ते वरून स्पष्ट होत नाही. मुद्दा असा आहे की, भारतीय मूळनिवासीयांना घटनेच्या सहाव्या परिशिष्टानुसार 'स्वायत्त प्रदेश','स्वायत्त जिल्हे', 'स्वायत्त परिषदा' याचे प्रयोजन करण्यात आले आहे. आदिवासी किंवा 'मूळनिवासी' अशा नामसंबोधनाने करण्यात आले नाही. हा महत्वाचा आणि तेवढाच ऐतिहासीक पार्श्वभूमीचा मुद्दा आहे. सहाव्या परिशिष्टानुसार अनुसूचित जमातींना देण्यात येणारी स्वायत्तता विशिष्ट भागातच लागू पडते. या प्रयोजनातून मध्य भारतातील, आंध्रप्रदेश ३१.७६ लाख, बिहार ४८.११ लाख, गुजरात ४८.४९ लाख, मध्यप्रदेश १ कोटी १९.८७ लाख, महाराष्ट्र ५७.७२ लाख, ओरीसा ५९.१५ लाख, राजस्थान ४१.८३ लाख अनुसूचित जमातीचे लोक राहतात. पश्चिम बंगाल ३.०७ लाख, तर उत्तर भारतात हिमाचल प्रदेश १.९७ लाख, आणि दक्षिण भारतात तामीळनाडू ५.२० लाख, कर्नाटक १ कोटी ८५.५० लाख, केरल २.६१ लाख अनुसूचित जमातींची लोकसंख्या आहे. एवढ्या मोठ्या जनसमुदायांच्या भागांना 'स्वायत्तता प्रदान' करणाऱ्यां प्रयोजनाच्या सहाव्या परिशिष्टातून वगळण्यात आले आहे. या जनतेला स्वायत्तता प्रदान करण्यासाठी स्वातंत्र्याच्या ५० वर्षानंतर ही कोणतीही राजकीय किंवा प्रशासकीय प्रक्रिया तयार झाली नाही.

भारतीय घटनेद्वारा आदिवासींना 'अनुसूचित जमाती' म्हटले आहे. अनुसूचित जमाती म्हणजे मुळनिवासी नव्हे. आदिवासीला अनुसूचित जमाती म्हंटल्याने आदिवासीचे मूळत्व नष्ट होते.

स्वायत्तता म्हणजे राजकीय स्वातंत्र्याचा अविष्कार आहे. घटनेच्या ५ व्या व ६ व्या परिशिष्टाद्वारा प्रयोजन करण्यात आल्यानुसार अनुसूचित जमातींना राखीव मतदार संघ ठेवण्यात आले आहे. परंतु आदिवासींना अनुसूचित जमातींच्या नावानेसुध्दा राजकीय स्वातंत्र्य बहाल करणारी स्वतंत्र यंत्रणा बहाल करण्यात आली नाही. राखीव मतदार संघ ठेवूनसुध्दा, आदिवासी समाजाचा विकास होण्याऐवजी समाज अधोगतीकडे जाताना दिसतो. समाजाचे चित्र उलटे आहे. भारतात आदिवासीच्या साक्षरतेचे प्रमाण ३६.७७ टक्केच आहे. महाराष्ट्रात ३,९४,३६७ आदिवासी कुटूंबे दारिद्रयरेषेखाली जीवन जगत आहे. त्यांचे प्रमाण ९०.८९ टक्के आहे.

आज भारतामध्ये, आदिवासींना स्वायत्तता बहाल करण्यात यावी, पाचव्या परिशिष्टातील अनुसूचित जमातींना, सहाव्या पशिष्टाच्या तरतुदी लागू करून स्वायत्त प्रदेश, स्वायत्त जिल्हे निर्माण करण्यात यावे, यासाठी प्रामुख्याने बिहार, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, आणि आसाम मधिल काही भागामध्ये मोठ्या प्रमाणात चळवळी उभ्या झाल्या आहेत. या चळवळी राजकिय भावनेतून प्रेरित होवून समोर आल्या असल्या तरीही, आदिवासींना स्वांयत्तता मिळायला पाहिजे या मुद्यावर कुणाचेच दुमत नाही. मात्र या मुद्यावर सामाजिक आणि राजकीय चळवळीचा एकजुटीने संघर्ष उभा झाल्याचे चित्र दिसत नाही. राजकीय चळवळीतून जेवढा संघर्ष उभा होण्याचे अपेक्षित आहे, तेवढा संघर्ष या मुद्यावर आजही उभा झाला नाही. राजकीय प्रतिनिधीत्व करणारे आदिवासींचे खासदार, आमदार ज्या राखीव मतदार संघातून निवडून आले, ते 'अनुसूचित जमाती' या नावाने निवडून आलेले आहेत. पर्यायाने हे आदिवासींचे पुढारी 'अनुसूचित जमाती' या नामसंबोधना विरूध्द आवाज उठवून आदिवासींना 'मुळनिवासी' म्हणून व्याखाबध्द करावे, या मागणीसाठी आपले आंदोलन कधीच उभे केले नाही. आदिवासींना स्वायत्तता मिळावी या मागणीतून, अप्रत्यक्षपणे व सकृतदर्शनी 'अनुसूचित जमातींना' स्वायत्तता मिळावी यासाठीच चळवळी उभ्या झाल्या आहेत.

## युरोपियन वसाहतवादाचे अपत्य 'अनुसूचित जमाती'

वास्को-डी-गामाच्या सफरीस ५०० वर्षे पूर्ण होत असल्याबाबत १२ ऑक्टो. १९९२ ला दोन जगाच्या मिलनांचा दिवस म्हणून साजरा करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघात स्पेनने ठराव मांडला. परंतु हा दिवस वसाहतवादाची सुरूवात होती. आणि रेडइंडियन (अमेरिकेतील आदिवासी) लोकांच्या गुलामगिरीची सुरूवात होती. म्हणून ५० आफ्रिकन राष्ट्रांनी विरोध केला. वसाहतवादाला विरोध करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने, मूळनिवासींच्या अधिकाराचा जाहीरनामा प्रसिध्द करून, १९९३ हे वर्ष जागतिक मूळनिवासीयांचे वर्ष म्हणून साजरे केले. जगात सर्व कानाकोपऱ्यांत मूळनिवासीयांचे वर्ष साजरे होत असतांना भारत शासनाने भाततीय आदिवासी हे मूळनिवासीच नाहीत अशी नकारात्मक भूमिका संयुक्त राष्ट्र संघात मांडून, आदिवासींवर हजारो वर्षापासून मनांत असलेला सुडच उगविला. भारतीय घटने मध्ये आदिवासींना 'आदिवासी' किंवा 'मूळनिवासी' ऐवजी अनुसूचित जमाती असे नामसंबोधन केले. त्यातून आदिवासींच्या मूळत्वाची जाण होत नाही. या शब्द प्रयोगाने आदिवासींचे अस्तित्व नाकारले जाते. संयुक्त राष्ट्र संघातील, मानवाधिकारांच्या जाहीरनाम्याच्या व्याख्येत 'आदिवासींना' मूळनिवासी असे व्याख्याबध्द करण्यांस, भारत शासनाची नकारात्मक भूमिका ही, आदिवासीचे स्वातंत्र्य नाकारणारी आहे.

आशियांमध्ये, युरोपियन वस्त्या निर्माण झाल्यानंतर आशिया मधील देशातील आदिवासींना / आदिवासी भागांना पूर्व-वसाहती राज्य (Pre-Colonical State) असे म्हंटले जात. तर युरोपियन वसाहतींना 'राष्ट्रियराज्य' 'National State' असे संबोधले जात असे. युरोपियन वसाहतींच्या संकल्पनेमधील, भारत, चीन, थायलँड, नागालँड, ब्रम्हदेश, या देशातील पूर्व-वसाहती राज्यामधील आदिवासींना जमाती (Tribes) असे नाम संबोधन केले गेले. त्यामुळे युरोपियन वसाहती पूर्वीचे जे आदिवासींचे स्वराज्य होते, त्यांना जमाती म्हणून ओळखल्या जात आहे. आशिया मध्ये जवळपास १५ कोटी पेक्षा जास्त मूळनिवासी आहेत. त्या सर्व देशातील आदिवासींच्या व्याख्येचा प्रश्न, म्हणजे संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवाधिकार जाहिरनाम्याच्या कक्षेत येण्यासाठी 'मूळनिवासी' म्हणून व्याख्याबध्द करणे आवश्यक आहे.

संयुक्त राष्ट्र संघाच्या कार्यगटासमोर, साक्ष देण्यास दक्षिण आफ्रिकेतील गोरे लोक गेले होते, त्या प्रमाणे भारतातूनही काश्मिरी पंडीत, भारताच्या वतीने साक्ष देण्यास गेले, आणि साक्ष नोंदविली की, "अल्पसंख्यांक (Minocities in India) हे भारतीय प्रस्थापितांचे वेगळे नाहीत आणि त्यांना समानतेची वागणूक दिली जाते."

Like-wise the Kashmiri Pandits community of India has been attending the session of the Working Group with the blessing of the Indian Government. Both these communities did not suffer from isolation or discrimination ( Page-45 - Documents 80)

आदिवासींना मूळनिवासी असे व्याख्याबध्द करण्याच्या नकारात्मक भूमिकांमूळे, चीनला सुध्दा आपल्या देशातील आदिवासींना मूळनिवासी म्हणून व्याख्याबध्द करण्यांस अडचण जाणवू लागली. भारताच्या नकारात्मक भूमिके मुळे, आशिया देशातील आदिवासींना मूळनिवासी असे व्याख्याबध्द करण्याबाबत दबाव निर्माण होत नाही. भारताच्या नकारात्मक भूमिकेबद्दल चीन आपली नाराजी व्यक्त करतो की, "China comments - Until a clear defination of Indigenous people has been established, the chinese Government, can not formulate specific opinion on individual clause of the draft declaration. The position of the P.R.C. makes clear what is Implict..... at least some Asian states may support, or at least not block. ( Page 8 - IWGIA Documents No. 80).

ऑक्टो. ९ ते ११, १९९६ मध्ये चैंग मै, (थायलँड) येथे आशियामधील मूळनिवासीयांचे अधिवेशन झाले. त्यांत मिस ख्रिश्चन इरनी, ह्या आपली भूमिका मांडताना म्हणाल्या

की, ''जमाती ही संकल्पना, युरोपियन वसाहतवादाची जननी आहे'' त्यांच्याच शब्दात संगायचे की.. I am aware that by this I have received the much criticised and long abondoned classificatory opposition between "State Societies and Non-State or Tribai Society". Above all the term "tribe', due to its association with European colonialism (page 21. IWGIA Documents 80).

भारत देशांत जेंव्हा जेंव्हा बाहेरून आलेल्यांनी आपल्या वसाहती निर्माण केल्या, तेंव्हा येथील मूळनिवासीयांना मूळनिवासी कधीच म्हटले नाही. त्यांना काळे, जंगली धरतीचे पापी प्राणी,गिरीजन, वनवासी अनुसूचित जमाती असाच शब्द प्रयोग केला. त्यांना मागासलेले म्हणून हिणविण्यात आले. युरोपियन वसाहतीचा, आदिवासी कडे पहाण्याचा दृष्टीकोण नकारात्मक होता, म्हणून 'जमाती' नावाचे लेबल लावण्यात आले. आशियातील आदिवासींना जमाती म्हणून ओळखले जाते, तर आफ्रिकन राष्ट्रातील आदिवासींना 'काळे' (निग्रो') म्हणून ओळखले जाते.

'जमाती' या नामबंधनामागे, राजकीय संकल्पनेचा उगम आहे. पूर्ववसाहती राज्यातील आदिवासी स्वराज्याची सीमा युरोपियन राष्ट्रराज्यांनी (Nation State) ,आपल्या राजकीय हक्कांसाठी निश्चित केली. आदिवासी भागात, युरोपियन वसाहतीद्वारे आपले राजकीय आसन मजबुत केल्यानंतर आदिवासींच्या परंपरागत राजकीय अवस्था, मोडकळीस काढण्यात आल्या. त्याचा परिणाम आदिवासी व वसाहतीतील जनता यांच्यात कमालीची असमानता निर्माण झाली. आदिवासींच्या जंगल संपत्तीचे व जमिनीचे तुकडे करून विभाजित करण्यांत आले.

पोलीस व सैन्यांकडून अत्याचार करण्यांत येवू लागले. आपल्या जमिनीवरचे व त्यांवरचे फायदे इ. चे हक्क सोडावे लागले. आदिवासींच्या पारंपारिक कायद्याला नकार देणे भाग पाडले गेले, आणि आदिवासीं मध्ये, आपले हिरावून घेतलेले राज्य, वैभव, आपले निसर्गदत्त अधिकार मिळविण्यासाठी आणि मानवीमुल्य जपण्यासाठी आज तो 'स्वायत्तता' मागतो आहे. संपूर्ण स्वातंत्र्य मागतो आहे. स्वनिर्धारणाचे (Self-determination) अधिकार मागतो आहे.

युरोपियन वसाहतीची 'जमाती' (Tribe) ही संकल्पना भारतीय घटनेद्वारा जशीच्या तशीच आत्मसात केली. आदिवासींना व्याख्याबध्द करण्यासाठी, त्यांचे अस्तित्व अबाधित ठेवून मूळत्व बहाल करण्यासाठी, स्वतंत्र भारताच्या घटनेमध्ये, कोणतेही प्रमाणबध्द निकष लावले गेले नाही. यांचे श्रेय, घटना-उपसमितीचे अध्यक्ष, ठक्करबाप्पा यांना जाते. त्यामुळे आदिवासींना वेगळी ओळख (Seperate Identity) बहाल झाली नाही. अशा प्रकारे आदिवासींना राष्ट्रविकास प्रवाहाचे बाहेर ठेवण्यात आले. आदिवासी माणसांसमोर आज प्रश्न असा उभा राहतो की, 'स्वायत्तता' मागण्यापेक्षा स्वत:चे अस्तित्व शाबूत ठेवण्यासाठी, 'जमाती' या शब्दाला नकार देवून 'मूळनिवासी' असे व्याख्याबध्द करण्यासाठी चळवळी उभ्या कराव्या लागणार आहे.

मात्र भारतीय प्रशासनाचा त्याला कठोर विरोध आहे. आम्ही स्वायत्तता मागतांना, पर्यायाने अनुसूचित जमाती म्हणून, स्वायत्तता मागतो आहे. या चळवळीचे सूत्र ''अस्तित्व नाकारल्या गुलामांनी आपल्या अस्तित्वाच्या नावाने, अस्तित्वहिन चळवळी उभ्या करणे'' असेच सिध्द होते. याचे कारण 'स्वायत्तता' मागणीच्या चळवळीवर विरोध होताना दिसत नाही, पण जेंव्हा आम्ही आमची वेगळी ओळख मागतो, स्वनिर्धारणाचे अधिकार मागतो, संपूर्ण स्वातंत्र्य मागतो, हिंदूंच्या वेगळी समाज रचना सांगतो त्यावेळी आदिवासी माणसास देशद्रोही ठरवून त्यांचेवर नक्षलवादी, आतंकवादी अशी भयानक विभूषणे लावून, चळवळी दाबल्या जातात.

## स्वायत्तता म्हणजे नेमके काय ?

भारतीय राज्य घटनेच्या कलम क्र. २४४(२) नुसार सहाव्या परिशिष्टाद्वारा बहाल केलेले स्वयत्त प्रदेश / जिल्हे / परिषदांचे प्रयोजन हे आसाम, मेघलय, त्रिपुरा, मिझोराम पुरतेच मर्यादित आहे. आदिवासींच्या इतर भागांत / क्षेत्रात

स्वायत्त प्रदेश /जिल्ह्याचे प्रयोजन नाही. सहाव्या परिशिष्टानुसार स्वायत्त प्रदान करणे म्हणजे, आदिवासी कडून आदिवासीद्वारा, आदिवासींसाठी केलेले प्रशासन होय. स्वप्रशासन चालविताना घटनेच्या कलम क्र. २७१(१) नुसार, स्वायत्त प्रदेशांना वेगळा निधी मिळण्याची तरतुद आहे. स्वायत्त प्रदेशांना स्वतंत्र कायदे, स्वतंत्र न्यायपालिका, कार्यकारी मंडळ बनविण्याचे अधिकार आहे. प्राथमिक शाळा, दवाखाने उघडणे, प्रादेशिक निधी गोळा करणे, जमीन महसूल गोळा करणे, नविन कराचे प्रयोजन करणे, खनिज शोधून काढण्यासाठी परवाने देणे, वार्षिक आर्थिक अहवाल बनविणे इत्यादि अनेक अधिकार बहाल केले गेले आहे.

स्वायत्त प्रदेशातून आदिवासींना, आपल्या लोकांसाठी आपणच राज्य करण्याचा निर्धार असल्यामुळे, ज्या ज्या राज्यात आदिवासी आहेत, त्यांना स्वायत्तता मिळाली पाहिजे यासाठी चळवळी समोर आल्या आहेत. खऱ्या अर्थाने, आसाम राज्यातच आदिवासी स्वायत्ततेच्या चळवळी उभ्या झाल्या असून, आसाम मधील काही भाग स्वायत्तेमधून सुटला आहे. त्या भागांना स्वायत्ता मिळावी म्हणून आणि ज्याभागांना स्वायत्ता लागू आहे. त्यांना पूर्ण अधिकार मिळावे म्हणून, आसाम मधिल बहुतांश विद्यार्थी वर्ग रस्त्यावर आला आहे. आसाम मधिल कब्री विद्यार्थी संघटना (K.S.A.) एन. सि. हिल्स विद्यार्थी फेडरेशन (NCHSF) मागील १० वर्षापासून सहाव्या परिशिष्टाद्वारे स्वायत्तता मिळावी यासाठी चळवळीत उतरले आहेत.

विद्यार्थी संघटनांची संयुक्त आघाडी (Autonomus State Demand Committee) निर्माण करण्यांत आली असून, त्यांचे म्हणणे आहे की, '' आम्ही आमचे उद्देश साध्य करून घेण्यासाठी शांततेच्या मार्गानी लोकशाही मार्गाचे तत्व पाळतो आहे. राज्य सरकारच्या, सैन्य व पोलीस दलाशी संघर्ष करण्यासाठी वेगळा शस्त्रलढा उभारण्या ऐवजी, आम्ही शांततेचा व लोकशाही तत्वाचा मार्ग अवलंबला आहे.

"We adopted democratic mass movemont as a weapon to achieve our goal. This means, democratising ourselves and the people though peaceful mass movement in all phase of our movement. ........ Inspite of the pocovaction we remained consist in our strategy of peaceful democratic mass movement, refusing to fall in to trap of isolated armed struggle though we continued to encourage militant mass responses against state repression" (Page-7 The North East Voice - June 1994)

ॲटोनॉमस स्टेट, डिमांड कमिटीद्वारे, राज्यसरकारवर दबाव आणल्यामुळे, आसामचे मुख्यमंत्रीद्वारा १ फेब्रू. १९९२ रोजी स्वायत्त राज्य निर्माण करण्याचा राज्यस्तरावर निर्णय होवून, केंद्र सरकारला प्रस्ताव पाठविण्याचे ठरविले. दि. २७ मे १९९२ रोजी दिल्लीला कोंद्रसरकार, राज्यसरकार, व ॲयोनॉमस स्टेट डिमांड कमिटीची त्रिशंकू बैठक घेण्यात आली, त्यामध्ये आसामचे मुख्यमंत्र्यांनी तत्वतः मान्य केले की, ''घटनेचे कलम क्र. २४४ (अ) प्रमाणे स्वायत्त राज्याला आवश्यक असलेले अधिकार, (राज्याला कोणतेही नांव न देता) व सर्व प्रयोजन लागू करण्याचे मान्य केले.''

पुढे चालून केंद्र सरकार समोर असा प्रश्न निर्माण झाला की, स्वायत्त राज्य दिल्यामुळे, राजकीय अधिकार जरी विभागले गेले तरी, पण हा प्रश्न कायदा व सुरक्षेचा असून, कायदा व सुरक्षेचे पूर्ण अधिकार गृहमंत्र्यांकडून हस्तांतरीत करण्यासाठी असमर्थता दाखविली. परिणामी 'बिना अधिकारांचे राज्य' (Autonomus State without powers) असा आदिवासी समोर चकवा निर्माण झाला या संदर्भात, आसामचे तत्कालीन मुख्यमंत्री, हितेश्वर सैकिया यांनी दिफ्फू (Diphu) येथे एका सार्वजनिक सभेत आपली खंत व्यक्त केली. "Fully exploiting the advantage of present "Status quo' or "Cease fire' between ASDC and Congress-I . This cease fire is very bad." ( Page - 8, North East Voice - June - 1994)

१९८९ मध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे, सुरागणा आदिवासी परिषदेमध्ये स्वायत्त प्रदेशांचा ठराव मंजूर करण्यात आला. त्यांची मागणी अशी होती की, धुळे, नासिक, ठाणे, रायगड, पुणे, नगर, जळगांव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, भंडारा, नांदेड इ. जिल्ह्यातील आदिवासी प्रवण जनक्षेत्रे एकत्र करून त्यांच्या कारभारासाठी 'स्वायत्त आदिवासी प्रदेश मंडळे' आणि महाराष्ट्र राज्य स्वायत्त आदिवासी प्रदेश मंडळाची स्थापना भारतीय राज्यघटनेच्या ६ व्या परिशिष्टात घटना दुरूस्ती करून करण्यात यावी.... महाराष्ट्र राज्य विधान सभेत २०/४/८९ तारखेला ही मागणी फेटाळताना आदिवासी विकात राज्यमंत्री मधुकर पिचड म्हणाले, ''स्वतंत्र मंडळ स्थापन करून आदिवासींना राष्ट्रीय प्रवाहापासून दूर करणे किंवा त्यांच्यात अलगत्वाची भावना निर्माण करणे योग्य होणार नाही. ''(पृष्ठ क्र. ४३ स्वयत्त आदिवासी राज्य व स्वयत्त आदिवासी प्रदेश शरद पाटील)

मध्यप्रदेशातही आदिवासी स्वायत्त प्रदेशांच्या मागणीला उचलून धरण्यांत आले आहे. आदिवासी चळवळीद्वारा, राज्यशासनावर दबाव आणला जात आहे. आजही तेथील आदिवासींच्या चळवळी अग्रेशित आहे. ३ डिसें. १९९५ ला यवतमाळ येथे एक विदर्भस्तरीय स्वायत्त परिषद भरविण्यात आली. पाचव्या परिशिष्टा अंतर्गत येणाऱ्या आदिवासी भागांना, सहाव्या परिशिष्टात समाविष्ट करून, स्वायत्त प्रदेशाच्या तरतुदी लागू कराव्या ह्या प्रमुख मागणीसाठी ही परिषद महत्वपूर्ण गाजली. मात्र या परिषदेमध्ये, १९८९ ला सुरगाणा येथे मंजूर करण्यात आलेल्या ठरावाबाबत आणि कॉंग्रेस शासनाच्या नकारात्मक भूमिकेबाबत दखलपात्र सखोल चर्चा झाली नाही. एवढेच काय पण संबंधित नेत्यांनाही बोलाविण्यात आले नाही. तात्पर्याने राजकीय पातळीवर, मतभिन्नतेचे अंतरंग जाणवत असले तरी, आदिवासींना स्वायत्तता मिळालेच पाहीजे या मताशी चळवळीत दुमत नाही हे निश्चित.

२२ जाने. १९९६ रोजी नाशिक येथे आदिवासी स्वायत्त परिषद भरविण्यात आली,तर २६ जाने. १९९६ रोजी प्रजासत्ताकदिनी, गुजरात मधिल निझर तालुक्यांत,राजपूर येथे ५० हजार आदिवासींचे महासंमेलन झाले. त्यात आदिवासींना स्वायत्त प्रदेश मिळावे ही एकमुखाने मागणि करण्यात आली. १४ डिसेंबर १९९५ ला दोन लाख आदिवासींच्या महाराष्ट्र राज्य विधान सभेवरच्या नागपूर येथे आयोजित केलेल्या मोर्चातही, आदिवासींना सहाव्या परिशिष्टा नुसार स्वायत्त प्रदेश मिळावे अशी जोरदार मागणी करण्यात आली. २८ जाने. १९९६ रोजी मुंबईला आदिवासी एकतेची परिषद भरविण्यात आली. ११ फेब्रु. १९९६ च्या स्वायत्त प्रदेश देण्यात यावे यासाठी एकमुखाने ठराव पास करण्यात आला. १८ मार्च १९९६ रोजी राज्यपाल भवनांवर, महाराष्ट्रातील आदिवासींचा भव्य मोर्चा आयोजित करण्यात आला. त्याद्वारे राज्यपालास एक निवेदन सादर करून, आदिवासींना स्वायत्त प्रदेश मिळावे, अशी मागणी करण्यात आली.

नागपूर येथे ३ मार्च ते ८ मार्च,१९९७ पर्यंत झालेल्या आंतरराष्ट्रीय आदिवासींच्या संमेलनात, भारतीय आदिवासींना, सहाव्या परिशिष्टा नुसार स्वायत्त प्रदेश देण्यात यावे, असा ठराव पास करून, भारत प्रशासनास कळविण्यात आले आहे. ''भारताचे मूळ रहिवासी असलेल्या आदिवासींचे होणारे स्थानांतर रोखण्या बरोबरच जंगलातील खनिज संपत्ती वाचविण्यासाठी ईशान्य भारतातील राज्याप्रमाणेच देशातील इतर आदिवासी क्षेत्रांना घटनेचे सहावे परिशिष्ट लागू करून, आदिवासी संस्कृती संरक्षित करण्याची गरज आहे,'' असे आग्रही प्रतिपादन लोकसभेचे अध्यक्ष मा.पी.ए. संगमा यांनी नाशिक येथे ६ व्या आदिवासी साहित्य संमेलनांमध्ये केले. (देशदूत नासिक - दि. २५ मे १९९७).

स्वतंत्र झारखंडाची चळवळ मागील कित्येक वर्षापासून आपणास पहावयास मिळते. आसाम, त्रिपुरामधील आदिवासींच्या स्वायत्ततेच्या चळवळीत वैचारिक तत्वे आढळून येतात. त्यांच्या चळवळीने हिंसक वळण घेतले आहे. अशी वैचारिक, विद्ध्वंसकता, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात मधील आदिवासींच्या चळवळीत आढळत नाही.

या नेत्यांचे घुटने राजकीय पुढाऱ्यांसमोर टेकतात. कब्रि विद्यार्थी संघटना, एन. सी. हिल्स विद्यार्थी फेडरेशन, ऑल मिसींग विद्यार्थी संघटना, मिसींग ॲक्टींग कमेटी, ऑल टिवा विद्यार्थी युनियन या सर्व विद्यार्थ्यांच्या चळवळीत वैचारिक विद्ध्वंसकता आहे, व्यवस्थेत नकार आहे. महाराष्ट्रातील आदिवासी चळवळीत एकसुत्रता दिसून येत नाही. ऑगस्ट १९९६ पर्यंत विदर्भात, आदिवासींना स्वायत्त प्रदेश मिळावयास पाहीजे या मागणीसाठी, आदिवासी राजकीय पुढारी विदर्भातील नागपूर, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, अमरावती भागातील आदिवासी क्षेत्रांना स्वायत्त प्रदेश मिळाला पाहीजे, यासाठी मोर्चे बांधणी मोठ्या प्रमाणात सुरू झाली होती. परंतु मध्येच स्वतंत्र विदर्भ निर्माण व्हावा, ही मागणी जोर धरू लागल्यामुळे, कॉंग्रेस विचार सरणीचे आदिवासी पुढारी, आदिवासी स्वायत्त प्रदेशाच्या मागणीला सोडून, स्वतंत्र विदर्भाच्या दावणीला बांधले गेले, तर बिगर-कॉंग्रेस वाले आणि गोंडवाणा विचारसरणीचे आदिवासी. पुढाऱ्यानी 'गोंडवाणा राज्य' मिळायला पाहीजे, या मागणीसाठी वेगळी चूल मांडली.

महाराष्ट्रामध्ये आदिवासींची लोकसंख्या, ७३.१८ लाख असून, एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात ९.२७ टक्के भिल्ल, १३.२७ टक्के महादेव कोळी, ६.२७ टक्के वारली, ६.१२ टक्के कोलाम आणि इतर आदिवासी आहेत. फक्त २० टक्के गोंड लोकांनी जातीय नावावर स्वायत्तता राज्य मागावे हा प्रश्न, जातीय अंत:कलह निर्माण करण्याचा एक प्रकारचा कटच होता. मात्र विदर्भात आदिवासी स्वायत्त प्रदेश होण्याचा मार्ग सुकर आहे. विदर्भातील ९ जिल्ह्यातील २६.०१ लाख आदिवासी ९७.४०४ चौ. कि. मी. क्षेत्रफळांचा सलग भाग, आदिवासी स्वायत्त प्रदेश निर्माण होवू शकतो. आदिवासींसाठी मेळघाट, पांढरकवडा, राळेगांव, रामटेक, आरमोरी, गडचिरोली, अहेरी हे राखीव मतदार संघ आहे. विदर्भ परिसरात, आशियामधील सर्वात मोठे महाऔष्णीक विद्युत प्रकल्प आहे. कोळश्याच्या खाणी आहेत. सिमेंट फॅक्ट्रीच आहेत. पेपर मिल आहे. फार मोठा राखीव जंगलाचा पट्टा पसरलेला असून त्यात अनेक खनिज दडलेले आहे. या सर्व प्रकल्पात, खनिज उद्योगांत, आदिवासी कामगार कार्यरत असून आदिवासी भागातील कच्चा माल, या प्रकल्पांत उपयोगात आणल्या जात आहे. या प्रकल्पांमुळे बऱ्याच आदिवासींना जमीनी सोडाव्या लागल्या आहे. मात्र आदिवासींना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी, त्यांना स्वायत्तता बहाल करण्यासाठी, आदिवासींच्या चळवळीतून, अजूनही उद्रेक निर्माण झाला नाही, ही शोकांतिका आहे.

अलिकडेच, २४ डिसें.१९९६ ला भारत सरकारने आदिवासी संबंधिचा एक नविन कायदा ''पंचायत-उपबंध (अनुसूचित क्षेत्राचा विस्तार) अधिनियम १९९६ पास केला आहे. या कायद्यानुसार खेडेगांवातल्या आदिवासींना जरी ग्रामपंचायत स्तरावर राजकीय अधिकार मिळत असले तरी, पण आदिवासी परंपरेतून चालत आलेली पाड्याची (गावांची) संकल्पना उद्ध्वस्त होणार आहे. या कायद्यानुसार नविन असा काहीही लाभ नाही. मात्र या कायद्याचा फायदा घेण्यासाठी आणि आर. एस. एस. च्या चळवळी आदिवासींमध्ये रूजविण्यासाठी करण्यांत येत आहे. गडचिरोली जिल्ह्यांत '' आमचे गांवी, आमचे सरकार'' ही चळवळ बि. डी. शर्मा यांचे नेतृत्वाखाली उदयास येत आहे. प्रस्तुत नविन कायद्याला 'आमचे गावी आमचे सरकार' ही संकल्पना आरूढ करू पाहत आहे.या चळवळीच्या माध्यमातून बि. डी. शर्मा हे आदिवासी मध्ये दुसरे ठक्करबाप्पा होऊ पाहत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित आदिवासींना खेड्यातून शहरात येण्याचे आव्हान केले तर म. गांधींनी शहरातून खेडेगावात येण्यासाठी 'ग्रामशासन' ही संकल्पना मांडली. या गांधीवादी विचार सरणीतून आदिवासी समाजाचे उत्थान होईल काय? आदिवासींना स्वायत्तता मिळेल काय?

## स्वायत्त प्रदेश मिळाल्यास आदिवासींना न्याय मिळेल कां?

आदिवासी स्वायत्त प्रदेशाची चळवळ जरी साकारत होत असली तरी, ज्या भागांना स्वायत्त प्रदेश मिळाले आहे, त्यांच्या व्यथा जाणून घेणे महत्वाचे आहे. आसाम मधील

कब्री, दिभासेस, मिझोखाशी, जवनिस भागाला दिलेली स्वायत्तता आदिवासींच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अधिकार पूर्णपणे बहाल करण्यास असमर्थ ठरली आहे.

बोडो नेते 'सन्सुमा खुंजूर विश्वमुथीरी' - म्हणतात की, ''आसाम मधिल बोडो लँड सह, अनेक स्वायत्त प्रदेश आदिवासींना न्याय देण्यास असमर्थ ठरले आहे. एवढेच काय पण आसाम अना-बोरो गणतांत्रिक सुरक्षा समितीने, गुवाहाटी उच्चन्यायालया मध्ये बोडो स्वायत्त परिषदेच्या घटनात्मक वैधत्तेला आव्हान केले आहे. आदिवासी स्वायत्त प्रदेशाला जे वित्त मिळणार आहे ते वित्त संबंधित राज्यसरकारकडून मिळणार असल्यामुळे, स्वायत्त प्रदेशांना पूर्णत: राज्य सरकारवर अवलंबून राहावे लागते.

राज्य सरकार सुध्दा आदिवासी स्वायत्त प्रदेशांवर संपूर्ण लक्ष केंद्रीत करण्यास असमर्थ ठरले आहे. आदिवासी स्वायत्ततेद्वारे जे कायदे किंवा नियम बनविण्याचे जे प्रयोजन आहे, ते भारतीय घटनेला छेदून नियम बनविता येत नाही. त्याची तरतुद घटनेच्या सातव्या परिशिष्टामध्ये करण्यात आली आहे. सातव्या परिशिष्टाच्या यादीप्रमाणे, आदिवासींना स्वतंत्र ओळख बहाल करणारे, त्यांना स्वनिर्धारणाचे अधिकार देणारे, आदिवासींना 'मूळनिवासी' असे व्याख्याबध्द करणारे, प्रयोजन नाही. आदिवासींच्या परंपरा कायद्याला, संवैधानिक मान्यता नाही.

आदिवासींचा पर्सनल लॉ, स्वायत्ताच्या तरतुदी प्रमाणे बनविता येत नाही. दुसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, स्वायत्त प्रदेशातील निवडून आलेले सदस्य, किंवा राखीव मतदार संघातून निवडून आलेले खासदार / आमदार हे नावाने आदिवासींचे असले तरी, खऱ्या अर्थाने ते आदिवासी पक्षाचे नसतात. ते ज्या राजकीय पक्षाकडून निवडून आलेले असतात, त्या पक्षाचे गुलाम असतात. त्यांना पक्षाचेच धोरण पाळावे लागते. कोणत्याही गैर आदिवासी राजकीय पक्षांकडे, आदिवासींच्या परिवर्तनाचा जाहीरनामा नाही.

भारतात एकूण ३१५ आमदार व ४० खासदार आदिवासींचे असतानाही आजपर्यंत कोणत्याही नेत्यांनी लोकसभेत / विधानसभेत आदिवासींच्या आयडेन्टी-फिकेशनच्या प्रश्नांवर, आदिवासींच्या स्वनिर्धारणांच्या प्रश्नांवर, आदिवासींना मूळनिवासी म्हणून व्याख्याबध्द करण्याच्या प्रश्नावर, कधीज आवाज उठविला नाही. हिच प्रक्रिया स्वायत्त प्रदेश मिळाल्यावर होणार आहे.

## आदिवासी स्वायत्तता आणि नि-वसाहतवाद

युरापियन वसाहती, 'जमाती' संकल्पनेची जननी असल्याचे आपण पाहीले आहे. युरोपियन वसाहतीमध्ये, आदिवासींना पूर्णपणे समाविष्ट करून टाकण्यात आल्यानंतर, राष्ट्रीय राज्यामध्ये (National State) झालेले अल्पसंख्यांक (आदिवासी) आपल्या स्वातंत्र्याची, खऱ्या स्वायत्ततेची (Genuine Autonomy) मागणी करू लागले.

"Most indigenous group especially where they represent a miniority in the "Nation State', they have been incorported in to, therefore opt for genuine autonomy. (Page 6- Many People-one struggle.)

खरी स्वायत्तता म्हणजे, आदिवासींना / मूळनिवासीयांना दिलेले संपूर्ण-स्वातंत्र्य होय. त्यांना स्वशासनाची दिलेली हमी होय. आदिवासींना सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक हक्क बहाल करणे. त्यांचे परंपरागत कायद्यांला मान्यता देणे, म्हणजे खरी स्वायत्तता होय. 'संपूर्ण-स्वायत्तता म्हणजे, आदिवासींना बहाल करण्यात येणारे स्वनिर्धारणाचे अधिकार होय. संपूर्ण स्वायत्तता, स्वनिर्धारणांच्या अधिकाराचा अविष्कार आहे.

## स्वनिर्धारणांचे अधिकार :

आज, प्रत्येक देशातला मूळनिवासी माणूस आपले स्वनिर्धारणाचे अधिकार संयुक्त राष्ट्र संघाद्वारे मागत आहे. भारत देशांत मात्र, एकाबाजूने आदिवासी स्वायत्ततेच्या

चळवळी उभ्या होत असतानाच, भारत शासनाद्वारे आंतरराष्ट्रीय स्तरांवरून, संयुक्त राष्ट्र संघामध्ये आदिवासींचे स्वनिर्धारणाचे अधिकार नाकारले आहे. जेमतेम स्वायत्ततेच्या निमित्ताने आपले स्वातंत्र्य मागण्यांच्या पवित्र्यांत असताना 'आदिवासींचे संपूर्ण-स्वातंत्र्य नाकारले जाते', ही कृती म्हणजे, आदिवासी चळवळीचा, गर्भाशयातच मर्डर करणारी आहे.

The Govt. of India also does not recognise the right of Self-determination of any gorup of people, with in India. Rights of Self-determination is applicable in the context of colonial situation of foreign occupation and not otherwise.(Page 15-North East Voice-June1994)

न्युक (ग्रीनलँड) येथे संयुक्त राष्ट्र संघाच्या आयोजित करण्यात आलेल्या दिनांक २४ ते २८ सप्टें. १९९१ च्या सभेत आदिवासींना स्वनिर्धारणाचे अधिकार, बहाल करणे म्हणजे, आदिवासी स्वातंत्र्याची पूर्व अट असून, त्यांना न्याय आणि शांती बहाल करणारी प्रक्रिया असल्याबाबत, स्पष्ट करण्यांत आले.

आसाम / बोडो मधिल आदिवासींच्या स्वायत्तते वरून आणि तेथील आंदोलनाची पार्श्वभूमी लक्षात घेता, आपल्या लक्षात येईल की, आदिवासींना दिलेली स्वायत्तता त्यांना वेगळी ओळख बहाल करण्यास असमर्थ ठरते आहे. आदिवासींना स्वायत्तता दिल्यानंतरही त्यांना मानवाधिकारांच्या जाहिरनाम्यात 'मूळनिवासी' म्हणून व्याख्याबध्द करणे, त्यांना स्वनिर्धारणाचे अधिकार बहाल करणे, हे, संपूर्ण स्वातंत्र्याचे प्रश्न तसेच कायम राहतात. त्यासाठी वेगळ्या चळवळी उभ्या होणे क्रमप्राप्त आहे.

आदिवासींना स्वनिर्धारणाचे अधिकार बहाल करणे, म्हणजे आदिवासींना स्वायत्तता देण्यापलीकडचे अधिकार आहेत. स्वनिर्धारणाचे अधिकार म्हणजे, आदिवासी स्वातंत्र्याचा जाहिरनामाच होय. हजारो वर्षे आदिवासींना दाबुन टाकण्यात आले, त्याचे निसर्गदत्त सर्व अधिकार नाकारले, त्यांच्यावर युरोपियन वसाहतींचा आणि हिन्दू व्यवस्थेचा पगडा पाडून, आदिवासी नवा-वसाहतवाद निर्माण करण्यात आला. या वसाहतीचे, नि-वसाहतीकरण करणे म्हणजे आदिवासींना स्वनिर्धारणाचे अधिकार बहाल करणे होय.

**स्वनिर्धारणाचे अधिकारी हे :-**

१) सध्या राहत असलेल्या आदिवासी प्रदेशांचे व स्वत:च्या जमीन संपदाचे अधिकार-

२) त्यांच्या जमीन संपदा, उत्पादित वस्तु आत्मसात करणे, त्यांची विल्हेवाट करण्याचे अधिकार-

३) स्वत:ची आर्थिक यंत्रणा उभी करून, त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार.

४) स्वसंस्कृती भाषा, परंपरा, चालीरिती, जीवन जगण्याची पध्दती जतन करून आपल्या नव-पिढीला सुसंस्कृत बनविण्याचे अधिकार-

५) स्वशासनाचे अधिकार आत्मसात करून आपली, परंपरागत राजकीय व्यवस्था कायम ठेवण्याचे अधिकार-

६) विदेश व्यापार आणि विदेशी यंत्रणे सोबत संबंध ठेवण्याचे अधिकार-

७) आंतरराष्ट्रीय स्तरावर, समविचारांच्या संघटनाशी, संलग्न होण्याचे अधिकार-

८) शांतता व सुरक्षित जीवन जगण्याचे अधिकार.

आदिवासींना स्वायत्तता मिळण्यात यावी. यासीठी ज्याकाही चळवळी उभ्या ठाकल्या आहेत. त्यांचा रेटा, तिथपर्यंतच मर्यादित न राहता, आणखी बरेच पुढे जावून, आदिवासींना 'मूळनिवासी' म्हणून व्याख्याबध्द करून घेण्यास व आदिवासींना राष्ट्रविकासाचे मुख्य प्रवाहात आणण्यासाठी,

अधिक तीव्र करणे आवश्यक आहे. आदिवासींना हिन्दू राष्ट्राचे लेबल लावून, त्यांचे निसर्गदत्त स्वातंत्र्याचे अधिकारावर गदा आणल्या जात आहे. आदिवासींची परंपरा कायदा, पर्सनल लॉ, निर्माण होणे आवश्यक आहे. आदिवासींना आंतरराष्ट्रीय स्तरावर सरळ संपर्क साधून आंतरराष्ट्रीय न्यायालयात आपले गाऱ्हाणे मांडता आले पाहिजे. आदिवासीला निर्णय घेण्यास सक्षम "Decision Making Authority' बनविल्या गेले पाहीजे. यासाठी आदिवासी स्वायत्ततेच्या चळवळी, स्वनिर्धारणांचे अधिकारासाठी परिवर्तीत झाल्या पाहीजे.

स्वनिर्धारणाचे अधिकार मिळवून घेणे म्हणजे, युरोपियन वसाहतीचे नि-वसाहतीकरण करणे होय. आजच्या, आदिवासी स्वायत्ततेच्या चळवळी, स्वनिर्धारणाचे अधिकारासाठी लढण्यास सिध्द होणे क्रमप्राप्त ठरते. स्वनिर्धारणाचे अधिकार, येथील व्यवस्थेला व युरोपियन वसाहतीला नकारून नव-समाज निर्मितिची प्रक्रिया आहे.

आदिवासी मानवाला, स्वतंत्र जगण्याचा या देशात अधिकार नसेल तर, भारतीय स्वातंत्र्य कुचकामाचे आहे. अलिकडील चित्र आपणास पाहावयास मिळते की, ह्या देशाचा राष्ट्रपती दलित आहे. लोकसभा सभापती आदिवासी आहे, अशी आंतरराष्ट्रीय स्तरावर बोंब ठोकून हिन्दूत्ववाद्यांकडून आम्ही धर्मनिरपेक्ष आहोत हे दाखविण्याचा फसवा प्रयत्न करीत आहे. हे सर्वोच्च पदस्थ असलेले, आदिवासी / दलित समाजाचे मान्यवर, आदिवासींची गुलामी नष्ट करून, त्यांना वेगळी ओळख बहाल करू शकणार आहेत काय?

आदिवासींना स्वनिर्धारणाचे अधिकार, त्यांचे पूर्ण स्वातंत्र्य बहाल करू शकणार आहेत काय? कधिच नाही.. यांचे कारण असे की, मा. के. आर. नारायणन, राष्ट्रपती आणि मा. पी. ए. संगमा, लोकसभा सभापती हे दोघेही युरोपियन वसाहती मधील रहस्य आहे. त्यांचेकडून हिन्दुवसाहत व युरोपियन वसाहत वादाला नाकारून नव-समाज उभा करू शकेल, अशी अपेक्षा अर्थहिन आहे, त्यासाठी आदिवासींनी स्वतःच्या स्वतंत्र चळवळी उभ्या करणे आवश्यक आहे.

## संदर्भ ग्रंथ


1) Vines that Won't Bind.

Indigenous Peoples in Asia = IWGIA-Document-8 Editor - Christioan Erni - (Copenhagen-1996)

2) Indigenous Peoples of Asia-

Many peoples, One struggle-

Editor-colin Nicholas & Raajen Singh - (Bangkok-Thailand-1996)

३) संविधान, भारत सरकार-

4) The North East voice - June - 1994 - & Sep / Oct.1996

Monthly joumal - Edited by Ranoj Pegu - Guwahati Assam-

५) 'जनहक' - फरवरी - १९९७, मासिक - संपादक - 'फैसल अनुराग- (रांची) बिहार-

६) पश्चिम भारीय स्वायत्त आदिवासी राज्याची भूमिका - कॉ. शरद पाटील - धुळे.

७) आदिवासी स्वायत्ततेची भूमिका - एल. के. मडावी - नागपूर -

८) Dalit Voice Aug 16 - 31, 1997.

Edited by V. T. Rajshekhar, Banglore

९) दै. देशदुत - नासिक दी. २५/५/१९९७.


• • •

# गौण वन उत्पादनावरील आदिवासींचा हक्क मान्य केला!

- रा. वि. भुस्कुटे

काशीपूरमध्ये जणूं एक प्रकारची क्रांतीच झाली आहे. आदिवासी महिलांची संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ओरिसामधील रायगड जिल्ह्यातील अम्मा संघटनेला डोंगरी झाडूबाबत वनखात्याने भाडेपट्ट्याचे अधिकार दिल्याने ही छोटी क्रांती झाली आहे. गौण वन उत्पादनाच्या भाडेपट्ट्याचा अधिकार आदिवासी संघटनेला प्रथमच सरकारने दिला आहे.

ट्रायबल डेव्हलपमेंट को. ऑपरेटिव्ह कार्पोरेशनकडे (टी.डी.सी.सी.) आजपर्यंत असलेला रायगड वन विभागातील काशीपूर रेंजमधील डोंगरी झाडू गोळा करण्याचा हक्क नव्या व्यवस्थेप्रमाणे अम्मा संघटनेला देण्यात आला आहे. साठा करणे, प्रक्रिया करणे, गठ्ठे बांधणे आणि झाडूंची विल्हेवाट लावण्याचा अधिकारांचाही या दिलेल्या हक्कामध्ये अंतर्भाव होतो.

राज्य सरकारने ठरविलेली रॉयल्टी अम्मा संघटनेला द्यावी लागेल. भाडेपट्ट्याच्या क्षेत्रामध्ये जमा केलेल्या डोंगरी झाडूंचा वाहतूक परवाना संघटनेला मिळणार आहे.

भुवनेश्वर येथे झालेल्या आदिवासी मेळाव्यात हे भाडेपट्ट्याचे अधिकार देण्यात आले. आणि तेथे संघटनेने ५००० झाडूंची विक्रीही केली. अम्मा संघटनेच्या सदस्या श्रीमती गुरूंगी नाइक हिने माहिती दिली की, गोळा केलेल्या डोंगरी झाडूंचा साठा, विक्री करण्यास परवानगी न मिळाल्याने, संघटनेकडे पडून आहे. १९९५ चा १७४ क्विंटल १९९६ चा ८१ क्विंटल तर १९९७ चा १३७ क्विंटल साठा विक्रीसाठी वाट पहात आहे.

सध्या साचलेला साठा विकून टाकणे ही आता प्रथम प्राधान्याची बाब बनली आहे. श्रीमती गुरूंगीने सांगितले की, ''डोंगरी झाडूंवर आम्ही प्रक्रिया करू शकतो. पण स्थानिक व्यापारी प्रत्येक क्विंटलला रू. १८००/- चा भाव देण्यास तयार आहेत.'' ''श्रीमती गुरूंगी पुढे म्हणाली गोळा करून आणलेल्या एक किलो डोंगरी झाडूला संघटना रू. १०/- देईल. शिवाय प्रत्येक झाडू बांधण्यासाठी एक रूपया देईल. साधारणत: एक व्यक्ती दिवसाला ५० झाडू तयार करू शकते.

खूप चळवळ केल्यानंतर हे भाडेपट्ट्याचे हक्क प्राप्त झाले आहेत. परंतु हे लक्षात घ्यावे लागेल की, राष्ट्रीय वननीती मधील आदिवासी जनता आणि वने या विभागात विशद केलेल्या तत्वानुसारच हे हक्क दिलेले आहेत. वनामध्ये करण्यात येणारी सर्व कामे आणि व्यवहारामधून सध्याच्या जंगल ठेकेदाराऐवजी आदिवासी सहकारी संस्था किंवा मजूर सहकारी संस्थांना प्रस्थापित केले पाहिजे ही नीती ठरविण्यांत आली आहे. मंदाबिसी महिला मंडळांनी गौण वन उत्पादनावरील आदिवासींचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी चाललेल्या लढ्याला सातत्याने पाठिंबा देणाऱ्या अग्रगामी या स्वयंसेवी संस्थेचे विद्यादासांच्या म्हणण्यानुसार आदिवासींनी गौण वन उत्पादन असलेले डोंगरी झाडू गोळा करून त्यावर प्रक्रिया करण्यास ओरिसा सरकारने घातलेली बंदी ही राष्ट्रीय वन नीतीचा भंग करणारी होती.

''गौण वन उत्पादनापासून सरकारला जरी भरीव उत्पन्न मिळत असले तरी ते गोळा करण्यासाठी वाहून आणण्यासाठी त्यावर प्रक्रिया करण्यासाठी आदिवासींना तासनूतास मेहनत करावी लागते. परंतु त्यांना गौण उत्पादनाचा साठा करून ते विकण्याचा परवानगी दिली जात नाही. भाडेपट्ट्याद्वारे सरकार या सर्व व्यवहारांवर नियंत्रण ठेवते आणि राजकीय पुढाऱ्यांच्या लहरीनुसार हे भाडेपट्टे प्रदान करण्यांत येतात पण त्यासाठी काही निश्चित निकष ठरविलेले नाहीत.''

सरकार जेंव्हा विशिष्ठ गौण वन उत्पादनाचा भाडेपट्टा देते म्हणजे जणू आदिवासींची पिळवणूक करण्याचा सर्वाधिकार पट्टेधारकाला देते असा दास यांचा दावा आहे.

जेथे टी.डी.सी.सी. चे कार्य चालू आहे. तेथेही साधारणत: स्वत:कडील भाडेपट्टा ही कार्पोरेशन कंत्राटदारांना पोटभाड्याने देते आणि मग त्या आधारे ठेकेदारांकडून भयानक पिळवणूक सुरू होते. अशी दास यांनी माहिती दिली.

गौण वन उत्पादनाची खरेदी किंमत ठरविण्यासाठी सरकार प्रत्येक जिल्ह्यात एक मुल्य निर्धारण समिती नेमते. परंतु याबाबत केलेल्या पहाणीमध्ये असे निदर्शनास आले आहे की, निर्धारित किंमतीच्या ५० टक्के किंमतीला आदिवासींना त्यांनी गोळा केलेली गौण वन उत्पादने विकावी लागतात. त्याशिवाय गौण वन उत्पादन खरेदी करणारे ठेकेदाराचे दलाल खोटी वजन मापे वापरून आदिवासींची सर्रास फसवणूक करतात.

गौण वन उत्पादनाचे व्यापारी महत्व ओळखून, सरकारने बहुतांश गौण वन उत्पादनाचे राष्ट्रीयकरण केलेले आहे. परिणामी कायदेशीर खरेदीदारांच्या संख्येत घट झाली आहे. परिणामी गौण उत्पादने गोळा करून आणणाऱ्यांना रास्त भाव मिळत नाही.

अम्मा संघटनेला दिलेल्या भाडेपट्ट्याच्या हक्कामुळे ओरिसा राज्यात एक चांगली लोकाभिमुख प्रथा सुरू होणार आहे. पण सरकारनी हा हक्क सुखासुखी दिलेला नाही. मोठ्या दीर्घकालीन लढ्यानंतरच आदिवांसी महिलांना तो प्राप्त झाला आहे.

मंदाबिसी ग्रामपंचायतीमधील महिलांनी मंदाबिसी महिला मंडळ स्थापन केले. या महिला मंडळांनी गेल्या तीन वर्षापासून जंगलातून डोंगरी झाडू आणि अन्य गौण उत्पादने गोळा करायला सुरूवात केली तसेच गांवातील अन्यँ वन उत्पादने गोळा करणारांकडून खरेदी करायला सुरूवात केली. गोळा आणि खरेदी केलेली गौण वन उत्पदने साठवायला व त्यांच्या विक्रीला त्यांनी जिल्हा आणि राज्य प्रशासनाकडे वारंवार परवानगी मागितली. परंतु त्यांची विनंती फेटाळून लावण्यात आली.

श्रीमती दास यांच्या मते मंदाबिसी महिला मंडळाला आलेला अनुभव हा काही अपवाद नाही. राज्यभर वेगवेगळ्या ठिकाणी आदिवासींचा आणि अन्य जनतेचा वनामधील संसाधनांच्या आणि वन जमीनीच्या वापराबाबत संघर्ष चालू आहे. मंदाबिसी महिला मंडळाच्या या यशस्वी प्रयोगामुळे विविध स्थानिक गट आणि स्वयंसेवी संघटनांच्या या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांना सामर्थ्य प्राप्त होणार आहे. तसेच आदिवासी जमातीबाबतचे राज्य सरकारचे सध्याचे विरोधी नाकारार्थी धोरण उघडे पडणार आहे असे श्रीमती दास यांनी प्रतिपादन केले आहे.

या घटनेबाबत गुरूंगी नायक हीची प्रतिक्रिया मोठी बोलकी आहे. ती म्हणते ''टी.डी.सी.सी. बरोबर आता आपल्याला चढाओढ करावी लागणार आहे. तेंव्हा आपल्याला खूप काम करावे लागेल.'' तिने पुढे सांगितले की, ''अम्मा संघटनेला अग्रगामीने सतत पाठिंबा दिला आहे. बाजारपेठेत अवलंबायचे धोरण, डावपेच आणि कागदपत्र कसे ठेवायचे याबाबत मार्गदर्शन केले आहे. आदिवासी महिलांच्या या पहिल्या धाडसी प्रयोगामध्ये सुमारे १०० गांवातून पसरलेले २०० सदस्य सामील आहेत. तर यात गुंतवणार असलेले भांडवल अवघे रू. ८४ ००० आहे. मंदाबिसी महिला मंडळाला तीन वर्षे चिकाटीनी लढा दिल्यानंतर गौण वन उत्पादन गोळा करून, साठवून, प्रक्रिया करून विकण्यासाठी भाडेपट्टा मिळविण्यांत यश प्राप्त झाले आहे. त्यामुळे राष्ट्रीय वननीतीची प्रत्यक्षात अंशत: तरी अंमलबजावणी ओरिसात झाली आहे. या यशापासून स्फुर्ती घेऊन ओरिसा राज्यातील आणि अन्य राज्यातील संघटीत आदिवासींनी त्यांना सहाय्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांनी आपआपल्या क्षेत्रात गौणवन उत्पादनावर आपला हक्क प्रस्थापित करून राष्ट्रीय वन नीतीचा प्रत्यक्षात अंमल केला पाहिजे. कंत्राटदार धार्जिणे केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे वनखाते लोकाभिमुख पुरोगामी राष्ट्रीय वननीती राबवतील अशी अपेक्षा बाळगणे व्यर्थ ठरेल.''

( संदर्भ ''ह्युमनस्केप, ऑगस्ट १९९७ मधील वेदाव्यास कुंडू यांचा लेख ''ट्रायबल राईटस् रेकग्नाइजड'')

● ● ●

प्रति,

संपादक 'हाकारा' यांसी

अतिशय खेदाने म्हणावेसे वाटते की आदिवासींचे शोषण थांबविण्याचे दृष्टीने आज शासन काहीच करीत नाही. खरे आदिवासी जे शेतमजुरी करुन कष्टाचे जीव जगत आहेत. त्यांचे सवलतींचा वाटा इतरच समाज लाटत आहेत. आदिवासींना नेतृत्व नसल्याने कोणीही त्याबद्दल आवाज उठवित नाहीत. काही उच्च जातींचे लोक नकली आदिवासी बनुन सवलती घेत आहेत. स्पर्धेमध्ये खरे आदिवासी कमी पडत असल्याने शहरी आदिवासी गुणात्मक दृष्ट्या सरस असल्याने अनेक सवलती बळकावित आहेत.

या देशातील कोष्टी, धनगर, राजपुत आणि गोवारी ह्या जाती प्रामुख्याने गैर फायदा घेत आहेत. ( त्यासाठी कोष्टीचे हलबा, धनगरांचे धनवर, राजपुतांचे भामटा तर गोवारींचे गोंडगोवारी करुन जातींचे दाखले घेतात व आदिवासींच्या सवलती मिळवतात.)

आज देशामधील नोकर भरतीची आकडेवारी तपासली तर असे दिसून येईल की ८० टक्के आदिवासींची जागा हलबा घेतात. १० टक्के राजपुत, भामटा, गोवारीं व धनगर आणि केवळ दहा टक्के खरे आदिवासींची भरती दिसेल. इतरही जाती जसे तेली (तिरमल) सोनार (ओतारी) आणि कुणबी (खैरे) असे दाखले घेऊन अनुसूचीत व भटक्या जमाजीची जमातांच्या सवलती मिळवत आहेत.

अशा परिस्थितीत समाज सेवकांनी संघर्षाची भुमिका घेतल्याशिवाय पर्याय नाही. त्यासाठी जातीचे वैधता प्रमाणपत्र सक्तीचे करावे. हे प्रमाणपत्र देतांना त्या अर्जदाराचे पांच नातलगांची जात, त्यांची आजी-आजोबा, आई-वडिलांची मुळ जातीची, बालवाडीची नोंद कटाक्षाने तपासली पाहिजे. आदिवासी उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे त्या जागा इतरत्र वळवण्यात येतात. त्याऐवजी त्यांना प्रशिक्षित ट्रेनी उमेदवार म्हणुन कमी पगारावर घ्यावेत व प्रशिक्षणांवर कायम करावेत. चतुर्थ श्रेणी व खालील जागा भरतांना अग्रक्रमाने आदिवासी घ्यावेत कारण ते उच्चश्रेणी पदासाठी लायक म्हणुन कमी प्रमाणात उपलब्ध असतात.

दुसरे म्हणजे अशी एक जरी नकली केस पकडली गेली त्यांना जबर शिक्षेची तरतूद असावी जातीचा दाखला दोताना रजिस्टर्ड आदिवासी संघटनेचे शिफारस पत्र जोडले पाहिजे. अशी चाचणी केंद्रीय भरती मंडळानीही करायला पाहिजे. दाखला देतांना भ्रष्टाचार झाल्याचे आढळल्यास जबर शिक्षा व्हायला पाहिजे.

देशाला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झाली तरी आदिवासींचे शोषण थांबलेले नाही. उलट वाढलेले आहे. अशा परिस्थितीत आदिवासी तरुणांची सेवा उभारुन अशी प्रकरणे चव्हाट्यावर आणणे ही काळाची गरज आहे.

कळावे.

आपला,

**नामदेव रामसाजी नेताम**

आदिवासी कल्याण समिती

बालाजीनगर, अकोला ४४४००४.

# सूची

१) जानेवारी - मार्च १९८० - जबरन जोत जंगल जमीन

२) एप्रिल - जून १९८० - आदिवासी व शिक्षण

३) जुलै - सप्टेंबर १९८० - आदिवासी व वनसंवर्धन

४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८० - आदिवासी साहित्य व कला

५) जानेवारी - मार्च १९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती

६) एप्रिल - जून १९८१ - आदिवासी व आरोग्य

७) जुलै - सप्टेंबर १९८१ - रोजगार हमी योजना

८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८१ -

९) जानेवारी - मार्च १९८२ - उत्ताराखंड अभ्यास मोहीम

१०) एप्रिल - जून १९८२ - धरणे व विकास

११ - १२) जुलै - डिसेंबर १९८२ - जंगल व्यवस्थापन

१३) जानेवारी - मार्च १९८३ - आदिवासी व दारू

१४) एप्रिल - जून १९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी

१५) जुलै - सप्टेंबर १९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य

१६) ऑक्टोबर - डिसेंबर १९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न

१७ - १८) जानेवारी - जून १९८४ - आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य

१९) जुलै - सप्टेंबर १९८४ - आदिवासी स्त्री

२०) ऑक्टोबर - डिसेंबर १९८४ - आदिवासी आरोग्य व शिक्षण

२१) जानेवारी - मार्च १९८५ - आदिवासी संघटन

२२) एप्रिल - जून १९८५ - जमीन हस्तांतर

२३) जुलै - सप्टेंबर १९८५ - आदिवासी महिला

२४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८५ - आदिवासी व सरकार

२५) जानेवारी-मार्च १९८६ - जंगल व धरण

२६) एप्रिल - जून १९८६ - आदिवासी कला

२७) जुलै - सप्टेंबर १९८६ - आदिवासी व वेठबिगारी

२८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय

२९) जानेवारी - मार्च १९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न

३०) एप्रिल - जून १९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल

३१ - ३२) जुलै - डिसेंबर १९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न

३३) जानेवारी - मार्च १९८८ - सवलती अपहरणाची समस्या

३४) एप्रिल - जून १९८८ - आदिवासी साहित्य

३५ - ३६) जुलै - डिसेंबर १९८८ - आदिवासी समाज व संस्कृती

३७ - ३८) जानेवारी - जून १९८९ - डॉ. वेरीअर एल्वीन विशेषांक

३९ - ४०) जुलै-डिसेंबर १९८९ - व्यवसाय मार्गदर्शन

४१ - ४२) जानेवारी - जून १९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती

४३) जुलै - सप्टेंबर १९९० - जागतिक आदिवासी

४४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९० - गं. बा. सरदार स्मृति विशेषांक

४५ - ४६) जानेवारी - जून १९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक

४७) जुलै - सप्टेंबर १९९१ - आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समर

४८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९१ - आदिवासी जीवन व संस्कृती

४९ - ५०) जानेवारी - जून १९९२ - सर्वसाधारण आदिवासी

५१ - ५२) जुलै - डिसेंबर १९९२ - अनुताई वाघ विशेषांक

५३ - ५४) जानेवारी - जून १९९३ - आदिवासी धर्म, सण व उत्सव

५५ - ५६) जुलै - डिसेंबर १९९३ - धरण-विस्थापन व पुनर्वसन

५७) जानेवारी - मार्च १९९४ - सर्वसाधारण आदिवासी

५८) एप्रिल - जून १९९४ - आदिवासी एकता परिषद

५९) जुलै - सप्टेंबर १९९४ - आदिवासी विकासाची सैद्धान्तिक भूमिका

६०) ऑक्टोबर - डिसेंबर १९९४ - आदिवासी जमाती

६१ - ६२) जानेवारी - जून १९९५ - राणीपूर विशेषांक

६३) जुलै - सप्टेंबर १९९५ - कुपोषण विशेषांक

६४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९५ - पर्यावरण विशेषांक

६५) जानेवारी - मार्च १९९६ - आदिवासी जमाती

६६) एप्रिल - जून १९९६ - महाराष्ट्र, ओरिसा अभ्यास दौरा

६७) जुलै - सप्टेंबर १९९६ - आदिवासी जमाती

६८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९६ - आदिवासी शिक्षण

६९ - ७०) जानेवारी - जून १९९७ - वारली लोकगीते व बोलीभाषा विशेषांक

७१) जुलै - सप्टेंबर १९९७ - पंचायतराज विशेषांक

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एक आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरुप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारुन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खाली पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमा ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्या विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर, सचिव

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

६४, आनंद पार्क, औंध,

पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

Printed by Jnana Prabodhini Mudran Vid